म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. न.
२५७७
REFBK-0002577

ॐ

कुंजविहारीकृत

# गीत-गुंजारव.

प्रस्तावना लेखक

प्रोफेसर गोविंद परशुराम पटवर्धन एम्. ए.
हेडमास्तर, हरीभाई देवकरण हायस्कूल, सोलापूर.

हृणदिन शके १८४८
न १९२६ )

लेखकानें सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

प्रथमावृत्ति, १००० प्रति.

किंमत १२ आणे.

# प्रस्तावनेपूर्वी

आज या ' गीतगुंजारव ' रूपानें माझ्या कांहीं केलेल्या कांहीं लिहिलेल्या कवितांचा संग्रह महाराष्ट्रीय सज्जनांस सादर करण्यांत येत आहे. यांतील दोन खेरीज करून बाकीच्या पन्नास कविता १९२० ते १९२५ अखेर या सहा वर्षांत लिहिल्या आहेत. नाशीक येथील ' गोविंद ' कवीच्या कविता गाऊन दाखविणारे गोसेवक गोखलेबंधु येथें आले नसते तर कुंजविहारी ' कवि ' झाला नसता. रामभाऊंच्या अनुकरणानें कविता करिता आल्या. गोविंद कवीच्या कविता ऐकून कविता लिहिल्या गेल्या. प्रथमतः माझ्या कमेटीविषयक उपहास गीतांनींच मला ' प्रसिद्ध ' कवी बनविलें, त्या उपहासपर गीताचें श्रेय श्रीयुत बाकळे यांच्या लिखाणाकडे आहे. १९२० ते १९२५ या महत्वाच्या अर्ध्या तपांत अचानक उत्पन्न झालेल्या परिस्थितींत जसा फरक पडला, तसाच लेखकाच्या तेव्हांच्या आणि आतांच्या कविता आणि इतर जीवित-हेतु विषयक कल्पनांतही फरक पडलेला आहे. या बदललेल्या मनोवृत्तीमुळें पुढील लेखनव्यवसाय चालू करण्यापूर्वी, आजपर्यंत झालेल्या लेखनसेवेबद्दल जनतारूपी जनार्दनास ' कौल ' लावून पहाण्याकरितांच हा पुस्तक प्रकाशनाचा प्रयत्न करण्यात आला. पुण्यामुंबईच्या मानानें सोलापूर म्हणजे एक मोठें खेडेगाव असून, अशा खेडेगांवातील खेडवळ कवीच्या पुस्तकाला पुन-

REFBK-0002577

...णाचा प्रसंग हमखास येईलच अशी खात्री कशी देता येईल ? पुस्तकावरील प्रसिद्ध होणाऱ्या बऱ्या वाईट टीका, जे थल्या तेथें राहतील, मात्र महाराष्ट्रातील पांचसात नामांकित विद्वानाचीं मतें, माझ्या कवितेबरोबरच दोन पाच तपानतरच्या वाचकास वाचावयास मिळतील असा दूरवर विचार करूनच १२५ पानाच्या पुस्तकास सुमारें तीस पानाइतका प्रस्तावना, अभिप्रायादि मजकूर जोडण्यांत आला आहे. माझ्या दृष्टीने बऱ्या असलेल्या कविता वाचकास अगोदर वाचावयास मिळाव्यात या एकाच कारणामुळें एका पुस्तकाचे ... तरी सहा भाग पाडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रसिद्ध झालेल्या संख्येइतकीच नकों वाटल्यामुळें नाहींशा केलेल्या व थोड्या समईं असलेल्या कवितेचीही संख्या असल्यामुळें कवितानुक्रम साधता आला नसला, तरी कालानुक्रम मात्र बहुतेक बरोबर दिला गेला आहे. काल संपलेलें वर्ष, विशेषतः शेवटचे सहा महिने लेखकास असह्य त्रासाचे व अस्वस्थ मनःस्थितीचे गेल्यामुळें पुस्तकाकडे साहजिकच दुर्लक्ष झाल्यावरून त्यात बरेच व्याकरणाचे दोष व क्वचित् कांहीं शब्दही वगळले गेले आहेत; तरी ह्मणण्यासारखी अर्थहानि होत नसल्यामुळें शुद्धिपत्र जोडण्याचें रहित केलें आहे. प्रथम ' कल्पतरू ' तूनच माझ्या गद्यपद्यात्मक लेखनास सुरुवात झाली. मजबरोबर कविता ह्मणून दाखविण्याकरिता कामीं माझे मेहुणे श्री. काशिनाथ विठ्ठल पाटील यांनीं मला अत्यंत मदत

केली. होतील तशा कविता लिहून देऊन त्या प्रकाशांत आणण्यापर्यंत संरक्षणाची सर्व जबाबदारी श्री. श. ब. तगारे बी. ए यांनीं घेतली. प्रो श्री. [illegible] चाफेकर हे गतिजयंतिनिमित्त सोलापुरास आले असताना त्यांनीं आगत्य-पूर्वक प्रोत्साहन दिलें नसतें तर [illegible]ची कल्पनाही माझ्या मनांत आली नसती प्रो. पटवर्धन यांनीं माझ्या व माझे स्नेही आणि सहकारि श्री वा. वा. कुलकर्णी मास्तर यांच्या विनंतीस मान देऊन कार्यव्यापृतत्वामुळें सवड नसतानाही आपला बहुमोल वेळ खर्च करून अत्यंत परिश्रम पूर्वक प्रस्तावना लिहून दिली देशभक्त [illegible]

यांनी त्यांना गुजारव अर्पण करण्याच्या माझ्या इच्छेला अनुमति दिली. श्री. आण्णासाहेब परांजपे आदि माननीय विद्वानानीं पुस्तक वाचून पाहण्याची तसदी घेऊन आपला योग्य तो अभिप्राय कळविला. अरुणोदय प्रेसचे मालक श्री. प्र. श्री. काकडे यांनीं पूर्वऋणानुबंधास स्मरून शक्य-तितक्या सवलतीनें छपाईचें काम करून दिलें. याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे.

[ गुजारवाच्या सुमारें शंभर प्रतींत ' प्रस्तावनेपूर्वी ' वरचें निराशेचे उद्गार लिहिले गेले आहेत. ]

सोलापूर २३।८।२६ }
पुनर्मुद्रण १।८।२६ }

कुंजविहारी.

# —: प्रस्तावना :—

कवि कुंजविहारी यांच्या कविता आम्हां सोलापूरकरांच्या चांगल्या परिचयाच्या आहेत. एवढेंच नव्हे तर " मुळशीचा पाळणा " वगैरे त्यांच्या काव्यांवरून ते पुण्यामुंबईकडे व इतरत्रही महाराष्ट्रांत बरेच मशहूर आहेत. आपल्या गीतगुजारवास मी प्रस्तावना लिहावी अशी त्यांनीं विशेष इच्छा प्रदर्शित केल्यामुळें सुचले ते पुढील चार शद्व मी प्रस्तावनेदाखल लिहीत आहें.

रा. रा. हरिहर गुरुनाथ कुलकर्णी सलगरकर उर्फ कवि कुंजविहारी यांचा जन्म, वडील निजामशाहींत नोकरीवर असतांना इ. स. १८९६ सालीं झाला. घरच्या गरिबीमुळें व लहानपणीच वडील निवर्तल्यामुळें त्यांचें शिक्षण फारसें झालेले नाहीं. चरितार्थासाठीं सोलापुरास आल्यावर प्रथमतः मधून मधून "कल्पतरूंत" ते लेख लिहीत असत. आणि या लेखांतच त्यांनीं ' कुंजविहारी ' हें टोपण नाव धारण केलें. याच सुमारास श्रीयुत रामभाऊ उबरगीकर यांच्या अनुकरणानें त्यांना कविता करण्याचा थोडथोडा नाद लागला. पुढें श्रीयुत बाकळे यांचें क्षत्रिय महात्म्य पुराण नामक आधुनिक ओवीबद्ध पुस्तक त्यांच्या वाचनांत आल्यावरून त्यांनीं नाटक सिनेमावर ( पृष्ठ १२४ ) आणि तशाच तात्पुरत्या विषयांवर पांच सात

उपहासपर कविता लिहिल्या. पण 'कुंजविहारी' यांच्या कवित्वाचा खरा आरंभ १९२० साली सोलापूर येथे प्रांतिक परिषद झाली तेव्हांपासून झाला. त्यावेळीं त्यांनीं स्वयंसेवक हणून नांव नोंदविलें त्याच दिवशीं " माझें ध्येय " ही कविता ( ४ ) लिहिली तेव्हांपासून त्यांची काव्यस्फूर्ति वळावत चालली असें ह्मणावयास हरकत नाहीं. नानाप्रकारच्या राष्ट्रीय व सामाजिक चळवळींत ते हौसेनें भाग घेत असतात. आणि त्यांत प्रसंगपरत्वे स्वकृतकाव्य ह्मणून दाखवीत असतात येथील 'बालमेळा' व विशेषतः वाङ्मयविहार व्याख्यानमाला " यादोन संस्था रा. कुंजविहारी यांनीं आपल्या मेहनतीने चांगल्या नांवारूपास आणल्या आहेत.

श्रीयुत कुंजविहारी यांची कविता हे सद्यःकालाचें अपत्य आहे. हें त्यांच्या या गीत–गुंजारवांतील लहानमोठीं ५२ गाणीं वरवर चाळून पहाणाऱ्याच्याही सहज लक्षांत येईल. कांहीं कवि असे असतात कीं, त्याचें काव्य तत्कालनिरपेक्ष असतें; व तत्कालीन घडामोडींचा अगर लोकस्थितीचा त्याचे काव्यांत उल्लेख आलाच तरी तो अगदीं कारणापुरता अस्पष्ट अथवा ओझरता असतो. उलटपक्षीं दुसरे कांहीं कवि असे असतात कीं, त्यांचें लेखन मुख्यतः तत्कालीन परिस्थितीचें चित्र असतें. उदाहरणार्थ मोरोपंत, तुकाराम वगैरे जुन्या कवींनीं आपलीं कवनें प्रायः एकतर जुन्या पौराणिक कथांचे आधारानें रचिलीं आहेत किंवा परमेश्वराला आळविण्याकरितां

त्यांनीं काढलेले ते भक्तिरसानें ओथंबलेले उद्गार आहेत. मोरोपंत पेशवाईचे भर अमदानींत हयात असून देखील त्यांचे काव्यांत त्या काळच्या राष्ट्राला हालवून सोडणाऱ्या पानिपतच्या लढाईसारख्या अगर नारायणरावाच्या वधासारख्या वृत्तांताचें प्रतिबिंब पडलेलें नाहीं. तो केवळ महाभारतीय कर्णार्जुनद्वंद्वांतच चूर. तुकारामबुवाही शिवाजीशीं समकालीन असले तरी त्यांनीं शिवाजीस व संभाजीस उद्देशून लिहिलेले उपदेशात्मक एकदोन अभंग सोडून दिले तर परसत्ता झुगारून देऊन स्वत्व स्थापन करण्याची त्यावेळीं महाराष्ट्रांत जी प्रचंड चळवळ झाली तिच्यापासून त्यांनीं आपल्या कवित्वास अगदीं अलिप्त ठेवलें आणि तें सर्वस्वी पंढरीच्या विठ्ठलाचे चरणीं अर्पण केलें.

या प्रकारच्या स्वकालनिरपेक्ष काव्यनिर्मिति करणाऱ्या कवींहून निराळ्या प्रकारचे वर उल्लेखिलेले दुसऱ्या प्रकारचे कवि म्हणजे स्वकालीन परिस्थितीपासून स्फूर्ति पावणारे होत व त्यांचे उत्तम उदाहरण म्हटलें म्हणजे मराठेशाहींत प्रसिद्धी पावलेले शाहीर अथवा पोवाडेकार हे आहेत. सिंहगडचा पोवाडा करणारा तुळशीदास शाहीर हा शिवाजीचा समकालीन होता. पानिपतचा प्रसिद्ध पोवाडा 'भाऊ नाना तलवार धरून ॥ गेले गिलच्यावर चढाई करून' हा पेशवाईंत हयात असलेल्या सगनभाऊनें केला. तसेंच नारायणरावाच्या वधावर

पोवाडा करणारा लहिरी मुकुंदा, खर्ड्याची लढाई गाणारे प्रभाकर, अनतफंदी, व होनाजी बाळा, सन १८०२ ४ च्या दुष्काळाचें वर्णन करणारा कविराय रामजोशी यास आणि अशाच दुसऱ्या कित्येक शाहिरास त्याच्या त्याच्या कालींच घडून आलेल्या प्रसगानी काव्य-स्फूर्ति झाली.

प्रस्तुत कवि कुंजविहारी हे वर लिहिल्याप्रमाणें या दुसऱ्या प्रकारचे ह्मणजे स्वकालीन परिस्थितीवरून व प्रसगावरून काव्य करणारे कवि आहेत. ते प्राचीन अथवा पौराणिक कथाना आपल्या कवितेंत थारा देत नाहींत अथवा कालातीत असणाऱ्या भगवद्भक्तीसारख्या विषयाचा आपल्या काव्या[illegible] संसर्ग लागू देत नाहींत असें मुळींच नाहीं. त्याचें सावित्री गीत [ पृ- ७८ ] महाभारतीय कथेच्या आधारानें रचलेलें आहे; तानाजी मालुसरे हा पोवाडा ( पृ० ७५ ) ऐतिहासिक प्रसगावर गाइलेला आहे; दावि रूप डोळां पाडुरगा ( ७० ) व पदरीच्या पाडुरगास ( पृ- ८८ ) हीं गीतें रचून त्यानीं त्याच्याच शद्वात सागावयाचें ह्मणजे, संतांच्या प्रदेशात प्रवेश केला आहे. परतु अशा रीतीनें त्यानीं पौराणिक व ऐतिहासिक कथानकाचा अथवा हरिभक्तीसारख्या विषयांचा काव्य निर्मितीस उपयाग करून घेतला असला तरी मुख्यत्वें त्याचा भर आधुनिक अथवा प्रचलित महत्वाच्या विषयास काव्यप्रदेशात आणण्याकडे विशेष आहे. निराळ्या शद्वात सागावयाचें

ह्मणजे ते विसाव्या शतकातील शाहीर आहेत. प्रस्तुत पुस्तकांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या बावन्न कवनापैकीं पचवीस कविता सद्य कालीन देशस्थितीस अनुलक्षून आहेत. यातूनही कित्येक गाणीं अगदीं लहान व कित्येक बरींच मोठीं असल्यामुळें ही तुलना निराळ्या तऱ्हेनें अशी करितां येईल कीं, एकदर १३५ पृष्ठांपैकीं ९२ पृष्ठें सद्य.कालीन विषयावर, व्यक्तींवर, अगर प्रसंगावर रचलेल्या गाण्यानीं व्यापलेलीं आहेत. व त्यात देश-भक्ति, टिळक, गांधीं, सोलापूरचे अप्पासाहेब वारद आणि सामंत, मुळशींच्या सत्याग्रह, नोकरशाही, नाटक, सिनेमा, म्यु-निसिपालिटी, असे नानाप्रकारचे विषय आलेले आहेत. श्री कुंजविहारी यांच्यांत व दुसऱ्या आधुनिक कवींत असा फरक आहे की कुंजविहारींचा कल सद्यःस्थितीचें वर्णन कर-ण्याकडे जसा आहे तसा तो इतरांचा नाहीं. इंग्रजी अमला पूर्वीच्या कवींच्या कवनामध्यें प्राय' न आढळणारा एक कवि-तेचा विषय, देशभक्ति हा अलीकडच्या बहुतेक कवींच्या आलापांत दिसून येतो किंवा निदान देशस्थितीकडे त्यांचें थोडें बहूत तरी लक्ष होतें असे दिसून येते. केशवसुतानीं आपल्या 'तुतारीनें' अवघडलेला कवटाळून निजलेल्या लोकांना सावध केलें. गोविंदाग्रजानीं श्रीमहाराष्ट्रगीताचे द्वारें ' श्रीम-हाराष्ट्रदेशाला प्रणाम ' केला, माधवानुजानीं शिवाजीचे तोंडीं छत्रसालास ' देशावरी ठेवूनि भक्ति आर्या , सर्वस्व अर्पी निजदेशकार्या ' असा उपदेश घातला, दत्तानीं 'वर्ष प्रतिपदे'

मध्यें ‘ परवशता जाळिते जनाला, असुर बहू मातले ’ असें ह्मणून विक्रम राजास हाक मारिली तांबे यांनीं ‘मातृभूमीप्रत’ ‘ नाहीं एक विचारही अर्जुनिथा त्वत्सेवनीं योजिला ’ अशी दु:खपूर्ण कबुली दिली, विनायकांनीं ‘ कोण देशकार्यासाठीं सोडील स्वहितीं पाणी यापुढें ’ असा सवाल टाकला, व हरी सखाराम गोखले यांनीं पैसा फंडा ’ स ‘ बरा शक्य तें सह्य नाना उपायें ’ असें बजावलें. याप्रकारें आधुनिक कवींना देशस्थितीची जाणीव आहे हें त्यांच्या काव्यावरून प्रसंगोपात्त दिसून येत असलें तरी सद्य:कालीन घडामोडींचा अगर खळबळींचा त्यांचे अंत:करणावर जोराचा आघात होऊन, त्यांचे तोंडून ती खळबळ काव्योद्गाराचे रूपानें बाहेर पडे- ल्याचें फारसें दिसून येत नाहीं. काहीं त्रोटक गीतें तशीं प्रसिद्ध झालेलीं आहेत परंतु तीं लक्षांत घेण्याइतकीं पुष्कळ नाहींत. नाहीं ह्मणावयाला ‘ मोगऱ्याच्या फुलांच्या ’ तिसऱ्या गुच्छांत पदव्या, राष्ट्रीय पक्ष, व पुराणधर्माभिमानी लोक यांचा उपहास केला आहे. परंतु एकतर मोगऱ्याचे पहिले दोन गुच्छ तत्कालीन परिस्थितीच्या आधारावर रचलेले ना- हींत आणि दुसरें जरी तृतीय गुच्छांतील तिन्ही प्रकारणाचें हरी नारायण आपटे यांनीं फार सुंदर आहेत असें वर्णन केलें असलें तरी काव्य या दृष्टीनें त्यांचा दर्जा किती उच्च लागेल हा प्रश्नच आहे. तात्पर्य दुसऱ्या काहीं कवींनीं आधुनिक शाहीर ह्मणवून घेण्याजोगें काव्य निर्माण केलें असलें तरी तें

फारसे साधण्याजोगें नाही आणि ह्मणून कुंजविहारी हे वि-साव्या शतकातील शाहीर होत व त्याची कविता सद्यःकालाचें अपत्य होय असें त्याचे वर विशेषत्वानें वर्णन केलें आहे.

कुंजविहारींच्या काव्यात प्रामुख्यानें दिसून येणारा गुण ह्मणजे करुणरस होय. कदाचित् त्यानीं व्यक्तिशः अनुभ-विलेल्या कष्टाचा अगर देशाच्या दुःस्थितीनें त्याचें हृदय कळ-वळत असल्याचा हा परिणाम असेल परंतु कसेंही असलें तरी करुण प्रसंग चितारण्याकडे त्यांचा ओढा विशेष आहे आणि अशा प्रसंगाच्या वर्णनात त्याची प्रतिभा आपल्या पूर्ण तेजानें स्फुरण पावू लागते यात शंका नाहीं. प्रस्तुत संग्रहापैकीं 'येउंदे करुणा' ( पृ० ८ ) 'करि बाळा जो जो गाई' ( पृ० २३ ), व 'भेटेन नऊ महिन्यानीं' ( पृ० ५४ ) हीं गीतें त्याच्या करुणकाव्याची उत्कृष्ट उदाहरणें आहेत. त्यापैकीं प-हिल्यात ह्मणजे 'येउ दे करुणा' यात शेतकरीवर्गाची हृदय-द्रावक दैन्यावस्था वर्णन केली आहे. वर्षभर पिकाचे आशेनें शेतात मरमर मरावें तोंच अकालीं पाऊस पडून सर्व धान्याचा किडीनें नाश व्हावा, त्यात गावगुंडानीं वैरणीच्या गंजीला आग लावून गुराढोराच्या तोंडचे अन्न काढून घ्यावें सरकारी सारा भरण्याकरिता घरचीं गुरें खाटकास विकण्याची पाळी यावी, एकुलत्या एक मुलाला युद्धाचे वेळीं रिक्रूट भरतीला नेण्यात यावें व तेथे तो बेपत्ता व्हावा, त्याचे शोकानें नायको मरून जावी, आणि मुलाच्या लग्नाचें कर्ज फेडून घेण्याकरिता

सावकारानें जप्ती आणावी अशा संकट परंपरेनें गांजलेला शेतकरी शेवटीं दु:खभार असह्य होऊन स्वतः प्राण सोडतो अशी कहाणी या कवितेंत गोंविलेली आहे. आणि हिंदुस्थानातील शेतकऱ्यांचें दारिद्र्य व त्यांनीं कष्टतर राहणी ज्यास माहीत आहे त्यास या कल्पनाचित्रात रेखाटलेले प्रसंग आमच्या शेतकऱ्यांच्या नित्य परिचयाचे आहेत हें सांगावें लागणार नाहीं

दुसरे गीत ' करिं बाळा जोजो गाई ' ' हे मुळशीचा पाळणा ' ह्मणून प्रसिद्ध असून शोकरसानें केवळ ओथंबलेले आहे. होनाजी बाळाने केलेल्या दुसऱ्या लावण्या त्याने न करिता फक्त ' घन:श्याम सुंदरा ' ही भूपाळीच केली असती तरी ही त्याचें नाव राहिलें असतें असें रा. शाळिग्राम यांनी आपल्या होनाजी बाळच्या लावण्यांच्या प्रस्तावनेंत ह्मटलें आहे अथवा मोठें उदाहरण घ्यावयाचें ह्मणजे कवि कालिदासाचें फक्त मेघदूत काव्यच शिल्लक राहिलें आणि त्याचीं बाकीचीं काव्यें व नाटकें नष्ट झालीं तरी त्याचें नाव कवि ह्मणून कायम राहील असें विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं संस्कृतकविपंचकात ह्मटलें आहे. त्याचप्रमाणें रा. कुंजविहारी यांच्या काव्यापैकीं फक्त मुळशीचा पाळणाच शिल्लक राहिला तरीही त्याचें नाव आधुनिक महाराष्ट्र कवींमध्यें चिरकाल टिकेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं टाटा कंपनीनें विद्युत्शक्ती उत्पन्न करण्याकरिता मुळशी पेठ्यात धरण बांधण्यास सुरुवात केली व त्या कामीं शेकडों शेतकऱ्यांच्या जमिनी सरकारच्या सहाय्यानें

त्यानेंकडून लँडऍक्विझिशन कायद्याखालीं खरेदी करण्यांत आल्या. त्यावेळीं शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध जी चळवळ झाली तिच्या कामीं या पाळण्याचा फार उपयोग झाला हा पाळणा गातांना ऐकून सहस्रावधी लोकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहिलेल्या आहेत, व याची प्रतीति कोणाही सहृदय वाचकास स्वतः तो पाळणा वाचून होण्यासारखी आहे. मुळशीच्या तळ्यात जिचें सर्वस्व गेलें आहे अशी एक शेतकऱ्याची विधवा स्वतः मरणास उद्युक्त झाली असून आपल्या नूतनोत्पन्न अर्भकास उद्देशून हा पाळणा ह्मणत आहे अशी कवीनें कल्पना केली आहे गीताची चाल करुणरसाला पोषक अशीच ह्मणजे 'अजि अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला' या गाण्याचीच आहे रचना गोड व मार्मिक आहे. व भाषा कुंजविहारींच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अगदीं साधी असल्यामुळें हृदयाला एकदम जाऊन भिडते.

वर उल्लेखिलेलें कुंजविहारींचें तिसरें करुण गीत 'भेटेन नऊ महिन्यांनीं' हें होय. हें मुळशीच्या पाळण्यापेक्षा जरा लहान असलें तरी तसेंच सरस आहे. चोरीचुराच्या खटल्यांत एका निरपराधी तरुणास फाशीची शिक्षा झाल्यानंतर त्यानें आपल्या आईस उद्देशून हें गाणें ह्मटल्याचें कल्पिलें आहे मी जरी आज जात असलों तरी फिरून मातृभूमीची सेवा करण्याकरितां तुझ्या शुभ उदरीं पुनः येईन हें या गाण्याचें तात्पर्य आहे. निरपराध्यास झालेल्या शिक्षा, निष्पापास सो-

साव्या लागलेल्या यातना, गरीबगुरिबावर झालेला अप्रतिकृत जुलूम, सत्त्वशील माणसास भोगावे लागलेले हाल, व एकदरींत जगामध्यें वारवार आढळून येणारा अन्यायाचा विजय व न्यायाचा पराभव हा सर्वकाळीं कवींना शोकपर काव्याचा अथवा ट्रॅजेडीचा विषय झालेला आहे. शेक्सपियरच्या हॅम्लेट ऑथेल्लो किंवा किंग लियर या सर्वमान्य शोकपर्यवसायी नाटकात वाचणाऱ्याच्या किंवा पहाणाऱ्याच्या हृदयाला चटका लावणारी मुख्य गोष्ट अशी असते कीं धर्माचा जय व अधर्माला शिक्षा या सामान्य नियमाला बळकटी येण्याजोगीं उदाहरणें जरी मधून मधून त्या नाटकातून दिसून येत असली, तरी एकदरींत मानवी विचार शक्तीच्या पलीकडे असणारीं, मनुष्याच्या सदसद्विवेक शक्तीला स्तंभित करणारीं, न्यायान्याया बद्दलच्या व त्याच्या परिणामाबद्दलच्या मामुली समजुतींना पार झुगारून देऊन तर्कातीत दुःखराशींनीं क्षुद्र व पंगू मनुष्यप्राण्याना, सुष्ट वा दुष्ट न्यायी वा अन्यायी याचा विचार न करिता, सर्वांना सारखेंच चिरडून टाकणारीं या सृष्टिरूपी अजस्र कोड्यातील दुर्ज्ञेय गूढें प्रेक्षकाची वृत्ति क्षणभर मूढ करून टाकतात आणि तेवढ्या वेळापुरता तरी तो विश्वाच्या अनंतत्वात व अज्ञेयत्वात स्वतःला विसरून जातो. हा प्रकार मुख्यात ग्रीक व इंग्लिश ट्रॅजेडींचा आहे. आणि अल्पप्रमाणात का होईना तसलाच अनुभव प्रस्तुत कवीचें ' भेटेन नऊ महिन्यानीं ' याच्यासारखें गाणें वाचून किंवा ऐकून येतो. ज्या

निरपराधी माणसाला देहांत शिक्षा झाली त्याचा न्याय इह-लोकीं होणें तरी शक्य नाहीं. मग परलोकीं किंवा जन्मांतरीं त्याला या जन्मीं झालेल्या अन्यायाची भरपाई काय मिळव-याची असेल ती असो, किंवा झालेला अन्याय हा त्याच्या पूर्वजन्मीं केलेल्या पापाचें प्रायश्चित्त असो.' तत्त्ववेत्त्यांनीं किंवा धर्माचार्यांनीं याचा वाटेल तितका कीस काढावा. परंतु सामान्य माणसाला तरी हे एक विश्वाच्या अनंत गूढांपैकीं गूढ आहे असेंच वाटणार.

श्रीयुत कुंजविहारींची कविता करुणरसांत विशेष खुलते असे वर सांगितले. परंतु इतर रस त्यांस माहीत नाहींत किंवा त्यांनीं ते अगदीं टाकले आहेत असे नाहीं. श्रीशिवछत्रपती (पृ० ६६) व तानाजी मालुसरे (पृ० ७३) या त्यांच्या दोन पोवाड्यांत त्यांनीं वीररस चांगला रंगविला आहे. पैकीं दुसरा पोवाडा वाचला म्हणजे शिवकालीन तुळशीदास शाहिरानें केलेल्या याच विषयावरील पोवाड्याची आठवण होते परंतु हीं दोन कवनें जशीं फार भिन्न काळीं रचिलीं गेलीं तशीच त्यांची रचनापद्धतीही फार निरनिराळी आहे तुळशीदासाचे पोवाड्याचें वैशिष्ट्य म्हणजे विस्तृत व क्वचित् पाल्हाळिक वर्णनशैली, मधून मधून कुणबाऊ भाषा, काव्यालंकाराचा अभाव, वृत्ताच्या व व्याकरणाच्या साफसुफीबद्दल बेफिकिरी अशा प्रकारचें असूनही तो शूरमर्दांचा पोवाडा शूरमर्दांनें ऐकण्यालायक आहे. कुंजविहारींचा पोवाडा अटपशीर, आधु-

निक सुशिक्षित मराठींत लिहिलेला, काव्यलकारयुक्त परंतु कुंजविहारींच्या पद्धतीप्रमाणें अतिरेकविरहित, व वृत्ताचे नियम सांभाळून केलेला आहे. आणि जरी तो तत्कालीन शाहिरानें रचिलेला नसला तरी त्यांत आवेश व ओजस्वीपणा भरपूर प्रमाणात आहे. नमुन्यादाखल तुळशीदासाचे पोवाड्यातील दहावा चौक येथें उतरून घेतों व त्याशीं कुंजविहारींच्या पोवाड्याची तुलना करावी ह्मणजे माझे ह्मणण्याचा प्रत्यय येईल. जाता जाता हें ही सांगतों कीं जुन्या शाहिराचे हे पोवाड्याचे चौक एकसारख्या लांबीचे नसतात. या दहाव्या चौकाचे वीस चरण आहेत तर पुढच्याच अकराव्या चौकाचे बत्तीस चरण आहेत. अशा प्रकारचा स्वच्छंदीपणा हल्लीच्या काव्यांत चालत नाहीं.

मामा बोलाया तो लागला । ऐशीं वर्षांचा ह्मातारा ॥ लग्निन राहिलें रायाबाचें । तो मजला सांगावें ॥ माझ्या तान्हाजी सुभेदारा । जे गेले सिंहगडाला ॥ त्याचे पाठिरे पाहिले । नाहीं पुढारे पाहिले ॥ ज्यानें आयारे खाईला । वाठा बुरजा लाविला ॥ त्याचे झाड होउनि आंबे बांधले । किल्ला हातीं नाहीं आला ॥ सिंहगड किल्ल्याची वार्ता काढू नको तानाजी सुभेदारा ॥ जे गेले सिंहगडाला । ते मरून-शानी गेले ॥ तुमचा सपाटा होईल । असें बोलूं नकोरे मामा ॥ आह्मी सूरमर्द क्षत्री । नाहीं भिणार मरणाला ॥ १० ॥

तुलनेस्तव कुंजविहारींचे पोवाड्यातील तिसरें कडवें पुढें

देतों —'उभारिला अंगणीं सुमंगल मांडव लग्नाचा' । नोवरा सुत तानाजीचा । महालक्षुमी घरी मंदिरीं मिरवत वरमाई । कुठेंही उणेपणा नाहीं । पति पत्नी अति आनंदें । जमवुनी सकल गण गोत । देवकार्य पूजित होती । नोवऱ्या मुलासमवेत । मंडपीं जाहली दाटी । बहु वाजंत्र्याचा थाट । शिवाजिचा जासूद पोहों चला निरोप घेवोनी । मराठा गडी यशाचा धनी ॥ २ ॥

कुंजविहारींचे काव्यांत एकंदरीत गंभीर वातावरण खेळत असलें तरी त्याना हास्यरसाचें वावडें नाहीं हें त्यांच्या 'नाटक सिनेमा माहात्म्य' ( पृ० १२४ ) व 'म्युनिसिपालिटीची आरती' ( पृ० १३१ ) या गाण्यावरून कळून येईल. अति शयोक्तीशिवाय विनोद नाहीं या न्यायानें म्युनिसिपालिटीच्या आरतींत त्यांनीं म्युनिसिपालिटीची निव्वळ एकांगी चेष्टाच केली असली आणि तिच्या सद्गुणाकडे तेवढ्या वेळापुरती डोळेझाक केली असली तरी त्याची टीका व्यक्तिद्वेषापासून अलिप्त असल्यामुळें कोणाच्या मर्मस्थानीं झोंबण्यासारखी नाहीं आणि झाला तर तिच्यापासून म्युनिसिपल कौंसिलरामध्यें क- र्तव्यजागृति उत्पन्न करण्याचा उपयोगच होण्याजोगा आहे.

वर उल्लेख न झालेल्या दुसऱ्या गाण्यात कुंजविहारींनीं निरनिराळे विषय गोंविले आहेत. 'माझें ध्येय' ( पृ० ४ ) यात त्यानीं स्वतःला राष्ट्रसेवेस वाहून घेतले आहे. 'बाल टिळक' ( पृ० १४ ) 'शारद गुणवर्णन' ( पृ० ४२ ) 'कै. जगन्नाथ मोरेश्वर सामंत' ( पृ० ८२ ), व 'गांधीगीत' ( पृ० १०१ )

हीं काव्यें त्यांनीं त्या त्या थोर व्यक्तींच्या गुणवर्णनपर रचिलीं आहेत. या सर्वांत त्याचें स्वदेशावरील उत्कट प्रेम दिसून येतें ' असित्यविनायक ' ( पृ० २३ ) यांत श्रीगणेशानें आईच्या हुकमाविरुद्ध प्रत्यक्ष बापाला देखील कैलासात प्रवेश करू दिला नाहीं ही कथा वर्णन केली आहे आणि त्यात गणेशाच्या कृतीवरून अन्योक्तिरूपानें वाचकास सत्याग्रहाचे थोरवीचा उपदेश केला आहे. कुंजविहारींचें बहुतेक काव्य राष्ट्रीय जागृतीस परिपोषक आहे व हेंही तसेंच आहे या गाण्यासंबधानें कै. जगन्नाथ मोरेश्वर सामंत यांनी आपल्या अभिप्रायात ह्मटलें आहे कीं ' एकंदरीनें काव्य या दृष्टीनें व जनतेस शिकवण हा दृष्टीनें हा पोवाडा बऱ्याच उच्च दर्जाचा आहे ' व तें यथायोग्य आहे ' दावी रूप डोळां पांडुरंगा ( पृ० ७० ) ' पंढरीच्या पांडुरंगास ' ( पृ० ८८ ), ' बारशीच्या भगवतास ' ( पृ० ९७ ) हीं तिन्ही गोड कवनें त्याच्या प्रेमळ भक्तिरसाचीं उदाहरणें आहेत; पण त्यातही बारशीच्या भगवंतास ' परवशतेचें जिणें जिवाला वाटे लाजिरवाणें ' असें कळवळ्यानें सांगावयास ते विसरत नाहींत. ' संध्या ' ( पृ० ११३ ) या गाण्यात त्यांनीं संध्येतलीं चोवीस नावें घेऊन प्रत्येकीं एकेक कविता रचून ईश्वराची प्रार्थना केली आहे. याच प्रकारची रामजोशाची लावणी प्रसिद्ध आहे मात्र रामजोशाचें ईश्वरस्तवन केवळ पौराणिक वळणावर आहे व कुंजविहारींचें राष्ट्रीय आकांक्षाचें द्योतक आहे. उदाहरणार्थ प्रत्ये-

कानें केलेली नरहरीची व अच्युताची स्तुति पुढें देतों.—
प्रल्हादाचे साठीं नरहरि स्तभीं जो प्रगटला। अच्युतें कालयवन मर्दिला। ( रामजोशी ). प्रल्हादास्तव नृसिंहरूपें स्तभीं गुर गूरी। राज्यहीन जगिं मुख दाबाया होत अह्मां चोरी। धांव धाव अच्युता सोडवी मरणातुनि असल्या। अपमानाचा डाग निघेना हरि काहीं केल्या। ( कुंजविहारी )

कुंजविहारींच्या काव्यासबंधानें एक गोष्ट सांगण्यासारखी आहे ती अशी कीं कवितादेवीचा विशेष आवडता असा जो ' आद्यो रसः ' शृंगार तो त्यांत बहुधा मुळींच आढळत नाहीं ह्मटले तरी चालेल. फक्त एकाच गीतात ह्मणजे ' गडे मज र्‍हर्दी घेउनि चला ' ( पृ० १२८ ) यात त्यानीं या रस-राजाला जरा दुरूनच सलाम करून लगेच त्याचा शेवटचा निरोपही घेतल्याचें जाहीर केलें आहे. कवीची गभीर वृत्ति आणि देशसेवेच्या आचीमुळें उत्पन्न झालेल्या छानछोकीचा तिटकारा यामुळें त्यानें हा मार्ग स्वीकारला असावा.

आता सर्वांत कठीण परतु एका दृष्टीनें सर्वांत महत्वाच्या अशा एका प्रश्नाचा उल्लेख करून व त्याचे उत्तर यथामति देऊन ही प्रस्तावना पुरी करितों. तो प्रश्न ह्मणजे प्रस्तुत कवीचा आधुनिक कवींत दर्जा कोणता आहे हा होय. अतिशय उच्च कल्पनेच्या भराऱ्या किंवा मनास चकित करून सोडणारी प्रतिभा किंवा वाचकास अथवा श्रोत्यांस आपल्या प्रचड ओघात वाहून नेणारें भाषाप्रभुत्व कुंजविहारींच्या अजून

पर्यंत प्रसिद्ध झालेल्या काव्यांत नाहीं हें कबूल केलें पाहिजे. दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें ह्मणजे ते कवींच्या पहिल्या रांगेंत बसूं शकत नाहींत किंवा निदान अजून त्यांनीं तें स्थान मिळविलें नाहीं. परंतु ते उत्तम नसले तरीं चांगले कवी आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं त्यांच्यांत दोष नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ त्यांच्या कृतींत कित्येक ठिकाणीं व्याकरणाचे दोष राहून गेले आहेत परंतु एकंदरीनें त्यांची शब्दयोजना मधुर असून समर्पक असते, त्यांच्या रचनेंत एक प्रकारचें स्वाभाविक संगीत असतें, त्यांच्या कल्पना सुंदर व गोंडस असून अश्लीलत्वापासून सर्वथा मुक्त असतात, त्यांचे चमत्कार नीटनेटके असून ते मनाला आल्हाददायक तर व्हावेत परंतु त्यांची दाटी तर होऊं नये अशा बेतानें योजिलेले असतात, त्यांचें काव्यांत बहुशः कांहीं तरी स्फूर्तिदायक उपदेश गोंविलेला असतो, आणि त्यांची वर्णनशैली प्रसादयुक्त असून त्यामुळें त्यांचें काव्य हृदयस्पर्शी व परिणामकारक होतें. हे गुण कांहीं लहान नाहींत. असो. त्यांनीं आपला उद्योग असाच पुढें चालू ठेवावा आणि अधिकाधिक योग्यतेची कविता निपजून लोकरंजन व लोकशिक्षण हीं दोन्हीं साधावीं अशी त्यांस विनंति करून मी आपला लेख पुरा करितों.

हरीभाई देवकरण हायस्कूल
सोलापूर ता. १८-६-२६

गोविंद परशुराम पटवर्धन.

# —: अभिप्राय :—

## १ श्री. शिवराम महादेव परांजपे, पुणें

रा. कुंजविहारी यांच्या कवितेंतील प्रतिभा आणि प्रसाद या दोन्हीही गोष्टी फार उच्च दर्जाच्या आहेत. ते स्वतः आपण केलेले पोवाडे वगैरे ह्मणून दाखवितात, त्या वेळेला त्याची जी तादात्म्यवृत्ति होते, ती फार वर्णनीय आहे. पुण्यातील व इतरही कित्येक ठिकाणीं त्यांनीं शिवाजी, तान्हाजी वगैरे शूर पुरुषांच्या संबंधानें केलेले आणि ह्मटलेले पोवाडे पुष्कळांनीं ऐकले असतील. व त्यावरून त्यांच्या रचनेमध्यें आणि त्यांच्या कंठरवामध्यें किती माधुर्य भरलेलें आहे, हें त्यांच्या प्रत्यक्ष प्रत्ययाला आलेलें असेल. त्यांची ' नोकरशाहीची आरती ' ह्मणून जी कविता आहे, ती फारच मार्मिक आणि प्रचलित वस्तुस्थितीदर्शक अशी आहे. सोलापूरचे सुप्रसिद्ध परलोकवासी सामंत वकील यांच्या निधनाबद्दल त्यांनीं काढलेले दुःखोद्गार फारच कळवळ्याचे आणि करुणरसानें परिप्लुत असे आहेत. याच पुस्तकामध्यें त्यांनीं सामान्यतः मृत्यूच्या संबंधानें जे थोडेसे अभंग लिहिलेले आहेत, ते तर इतके सुंदर आहेत कीं, ते वाचले असतां अंतःकरण सद्गदित होणार नाहीं, असें कधीं होणें शक्यच नाहीं. व इतके सुंदर

विचार ज्या कवीच्या मनामध्यें प्रादुर्भूत होतात, त्या कवीची योग्यता खरोखरच फार मोठी असली पाहिजे, असें कोणालाही वाटल्यावाचून राहणार नाहीं. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास, मोरोपंत, रामजोशी, होनाजी-बाळ, वगैरे अनेक कवींनीं जोपासना केलेल्या मराठी कवितेला हल्लीं मोठे कष्टाचे दिवस आलेले आहेत व जिच्यांत पूर्वी प्रसाद गुण ओतप्रोत भरलेला होता, ती मराठी कविता हल्लीं काय बोलते आणि काय विचार प्रकट करते, हेंच समजेनासें झालें आहे. अशा या मराठी कवितेच्या दुर्दशेच्या दिवसामध्यें ज्याच्या कवितेचा अर्थ ती कविता ऐकल्याबरोबर समजतो, असे रा. कुंजविहारी यांच्यासारखे सरळ सुंदर कविता करणार कवि उत्पन्न होत आहेत ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. रा. कुंजविहारी यांचें आधुनिक पद्धतीचें शिक्षण अगदीं बेतानेंच झालेलें असूनही त्यांची कविता इतकी प्रतिभासंपन्न, इतकी प्रसन्नतायुक्त, आणि इतकी स्फूर्तिदायक असते, यावरून कवि हे युनिव्हर्सिटीच्या शिक्षणानें निर्माण होत नसून ते ईश्वर निर्मितच असतात, हा सिद्धांत कोणाच्याही मनावर जास्त जोरानें ठसल्यावाचून राहणार नाहीं.

---

## २ श्री. नरसिंह चिंतामण केळकर, पुणें.

कवि कुंजविहारी यांचा स्फुट कवितांचा संग्रह वाचून पाहिला. जुन्या शाहिरी कवितेशीं त्याचें मला फार साम्य वाटलें

शाहिराचे काव्य तत्तत्काालीन लोकस्थितीशीं तादात्म्य पावलेलें असे. शृंगाराविषयक लावण्या सोडल्यास निवळ कल्पनेंत विलास करणारे शाहिर नाहींतच ह्मटलें तरी चालेल. त्यांचा दुसरा विशेष ह्मणजे प्रसाद व ओजस्विता. हे तीनही गूण प्रस्तुत कवीच्या ठिकाणीं उत्कटत्वानें वास करितात यांत शंका नाहीं बहुतेक जुने शाहीर भाषेच्या बाबतींत सव्यसाची होते. मराठी प्रमाणें हिंदी भाषेंतहि त्यांचा हातखंडा असे मराठी कवितेच्या दृष्टीनें या गुणाची मोठीशी मातबरी नसली तरी कुंजविहारी कवीचे शाहिरीस्वरूप परिणत करणारी गोष्ट ह्मणून तिचा उल्लेख केला. शेवटची साम्याची गोष्ट ह्मणजे भाषाशुद्धि कडे दुर्लक्ष 'भवीतव्यते' सारखीं पुष्कळ अशुद्धें असलीं तरी पण त्यानें रसहानी झालेली नाहीं हें नमूद करणें अवश्य आहे

'येऊ दे करुणा' 'करि बाळा जो जो गाई' हीं करुणगीतें दावि रूप डोळा पांडुरंगा' पंढरीच्या पांडुरंगास' व विशेषतः 'बारशीच्या भगवतास' हीं उत्कंठापूर्ण उत्कट भक्तिगीतें 'स्वतन्त्रतारुक्मिणीहरणाचें' रूपक, 'शहरचें सुख' नोकरशाहीची आरती' 'म्युनिसिपालिटीची आरती' इ- उपहास गीतें हीं मला फार चांगली वाटली, 'चिमणा शूर शिपाई' व 'ओंवाळणी' या बालक विषयक कविताहि मोठ्या नाजुक व मनोहर आहेत. 'सावित्रीगीत' मोरोपंती स वित्रीगीता सारखेंच प्रासादिक व सुंदर असून पाठ करण्य सारखेंच वठलें आहे.

३ प्रो. श्रीकृष्ण निळकंठ चापेकर,

एम्. ए. एल् एल् बी.

डेक्कन कॉलेज, पुणें

'जनतागीते' या दृष्टीनें, 'गुंजारवा'तील कविता फार परिणामकारक व आल्हादजनक झाल्या आहेत. विशेषत: 'जनतागीता'चा मुख्य आत्मा जो,—साधारण जनतेच्या निकारा विचाराशीं व मनोभावनाशीं स्वानुभवानें तादात्म्य असणें व त्याच्याबद्दल आंतडें पिळवटून कळकळ वाटणें— हा गुण तो याच्या कवितेत स्पष्टपणें प्रतिबिंबित झालेला दिसतो. म्हणूनच, दुसऱ्याचश्या इतर कवित संबंधीं अभिप्राय देताना कित्येकांकडून सहजगत्या योजला जाणारा हृदयस्पर्शी हा शब्द 'कुंजविहारी'च्या 'शेतकऱ्याचें गाणें' 'भेटनें नऊ महिन्यानीं' वगैरे करुणोत्कट गीतानाच विशेष सार्थ व समर्पक दिसतो. करुणरसाप्रमाणेंच मार्मिक खोचदार विनोदातही 'कुंजविहारी'याचें चांगलें कौशल्य दिसून येतें. शिवाय एकंदरीनें विषयाची निवड, त्यास अनुरूप अशी [ विषयांची ] त्याची आकर्षक व परिणामकारक सजावट आणि प्रसंगोपात्त, उदात्त भक्तिप्रधान; किंवा उत्कट देशाभिमानयुक्त विचाराचा व भावनाचा परिपोष—इ० गोष्टीसंबंधीं 'गीत-गुंजारवा'तील बहुतेक गीतांत, खऱ्या कविहृदयाच्याच प्रसन्नतायुक्त व आनंददायक ऊर्मींचा प्रत्यय आल्यावाचून रहात नाहीं.

४ प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले, न्यू पूना कॉलेज पुणें

'गीत-गुंजारव' आम्हीं बराचसा वाचला कवीची भाषा प्रायः सहज, सरळ सुबोध व प्रेमळ आहे. तिच्यांत एक प्रकारचा ओघ असून प्रसंगविशेषीं चमकही आहे. कवीनें बाह्य सृष्टींतील अनेक विषयांचा परामर्ष घेतला आहे. पण त्यांतल्यात्यांत त्याची वृत्ति आणि वाणी शाहिरीगीतांत अधिक रमली आहे. श्रीशिवछत्रपति, तानाजी मालुसरे, सु-ळशीचा पाळणा, शेतकऱ्याचें गाणें इत्यादि गीतें वाचून ही गोष्ट प्रत्ययाला येते. कवि देशभक्त असून देशाच्या प्रस्तुतच्या अवनतीसंबंधानें त्याचें अंतःकरण तळमळत असल्याचें अनेक गीतांवरून निदर्शनाला येतें. वृत्त विषयाच्या विविधतेमुळे व वैचित्र्यामुळें गीतें वाचतांना कटाळा येत नाहीं. व्याकरण व छंद यांशीं कवीनें क्वचित् स्वच्छंदानें वर्तन केलें आहे, तसेंच कोठें कोठें सामान्य व्यक्तींची अतिरिक्त प्रशंसा करण्याचा मोह त्यास झालेला आहे. तथापि अधिक अनुभवानें या सं-बंधांत कवीची सुधारणा होत जाईल असा भरंवसा वाटत आहे- रामजोशांनीं ज्या भूमीमध्यें आपल्या नितांत सुंदर शाहिरीकाव्याचा ध्वज उभारला त्याच भूमीमध्यें कुंजविहारी उदयाला यावा हा योग अभिनंदनीय नाहीं असें कोण ह्मणेल ?

---

५ ग. वी. केतकर, उपसंपादक केसरी व मराठा, पुणे

श्री. कुंजविहारी यांचा संग्रह बऱ्याच वरच्या दर्जाचा असून त्यांतील काहीं कविता तरी वाङ्मयांत अढळ राहण्याच्या योग्य-

तेच्या आहेत. मुळशीचा पाळणा किंवा शेतकऱ्याचें गाणें हे समुदायात ह्मटलें जात असता समुदायाचें अंतःकरण उचंबळून स्त्रीपुरुषांचे डोळे करुणरसानें अश्रुपूर्ण झालेले मी पाहिले आहेत. पूर्वीच्या संतकवींचे काव्य वाचताना मधून मधून अशी शंका येते की या संताना देशाची तत्कालीन अवस्था पाहून अंतःकरणास पीळ पडत नव्हता काय? पण देवाच्या मार्गाकडे निघालेल्या यात्रेकरूनीं देशाकडे दुर्लक्ष केलें तर तें एकवेळ उदात्त उत्कटतेचें लक्षण ह्मणून क्षम्य ठरेल. पण फुलपाखरें ( क्वचित् वनातलीं पण बहुधा जनातलीं ) चांदण्या ( क्वचित् नभातल्या पण बहुधा जनातल्या ) यांच्या मागे लागून देशाला विसरणाऱ्या कित्येक आधुनिक कवींना काय ह्मणावें? ही एकमार्गी उत्कटता संताच्या उत्कटतेप्रमाणेंच क्षम्य मानता येत नाहीं. देव देशाच्या वर आहे पण जनातलीं फुलपाखरें किंवा चांदण्या याना देशाच्या वर चढविण्यास कोणीहि तयार होणार नाहीं. रामदासांचे देशस्थितीबद्दलचे जिव्हाळ्याचे उद्गार वाचले ह्मणजे संतकवींच्या अफाट वाङ्मयामध्यें या विशिष्ट बाबतींत असलेल्या गाढ अंधकारात एकच मिणमिण दिवा लुकलुकतो आहे असें वाटूं लागतें. अलीकडच्या कवींमध्यें मात्र बऱ्याच कवींनीं देशस्थितीबद्दलच्या आपल्या भावना काव्यात प्रगट केल्या आहेत व त्यामध्यें श्री. कुंजविहारी यास बराच वरचा क्रमांक द्यावा लागेल. ‘ रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळालें? ’ असा खडखडीत सवाल दे-

शाला विचारणारे गोविंद कवी नुकतेच निवर्तले. तितक्याच खडखडीत गीतीनें श्री. कुंजविहारी हे सरकारला सवाल करतात कीं. 'नवे कायदे नव्या करानें जन होती बहु बेजार। निःशस्त्रा वरि हत्यार धरिला थुः तुमच्या जिनगानिवर। परवशतेचा पाय पादरा कुठेंही कायम नच टिकला' किंवा ' प्रभुशक्तीचा प्रभाव पटला सर्व जगाला अजि पुरता। केसरशाही धुळिस मिळाली क्षणांत झाली बेपत्ता। कुंजविहारी ह्मणे तोच प्रभु आर्यांचा पालनवाला। समजुनी उमजुनी रोख ठोक मनिं उत्तर याचें द्या मजला' देवाजवळ वैय्यक्तिक गाऱ्हाणें सांगून भक्तीचा प्रसाद मागण्यापेक्षा ' राज्यहीन जगिं सुख दावाया द्वैत अशा चोरी ' असें देवाजवळ देशाचें गाऱ्हाणें सांगून ' स्वातंत्र्याचा प्रसाद ' मागणें हें अधिक उदात्त नाहीं काय? निशा, उषा, पृथ्वी, आकाश, समुद्र, सूर्योदय, सूर्यास्त इत्यादिकांकडे पाहून प्रेमाच्या उत्प्रेक्षा अलीकडे कवींनी अतोनात केलेल्या आहेत. पण समुद्र व सूर्य पाहून— ' परमेशाला साग जाउनी मावळल्या सूर्या। आर्यजनापरी स्वतंत्र व्हाया धडपडतो दर्या॥ ' असे उद्गार काढणारे कवि कचित् भेटतात. हिंदुस्थानाला प्रयत्नानें व परमेश्वरी कृपेनें ' स्वातंत्र्याचा प्रसाद ' ज्या वेळीं मिळेल त्या वेळीं या कामात खपलेल्या योद्ध्याची, पुढाऱ्यांची, मुत्सद्द्याची, विद्वानाची स्मृति कारेतांना ' कुंजविहारी ' सारख्या स्वातंत्र्यप्रेरक कवीची स्मृतीहि राष्ट्र आनंदानें व अभिमानानें जागृत ठेवील.

# आशीर्वाद.

नियतिकृतनियमरहितां ह्लादैकमयीमनन्यपरतन्त्राम् ॥
नवरसरुचिरां निर्मितिमादधती भारती कवेर्जयति ॥

कवि ' कुंजविहारी ' चा ' गीतगुंजारव ' मी मोठ्या आवडीनें लक्ष्यपूर्वक वाचून पाहिला. सहृदय वाचकाचें हृदय वाचनाचे ओघांत, त्या त्या स्थळीं त्या त्या भावनोद्रेकासरशीं आपल्याशीं तेव्हांच तदाकार करून सोडण्याचें या कृतींत प्रभुत्व दिसलें, आणि यामुळेंच कुंजविहारी याना कवि हें नाव अन्वर्थक शोभतें. ही रचना सहज, सरळ, सुबोध व आल्हादजनक अशी असल्याने हींत प्रसाद व ओज हे दोन्हीं काव्यगुण सुस्पष्ट आहेत. यातील करुणरस अकृत्रिम सुंदर व हृदयस्पर्शी आणि वीररस स्फूर्तिजनक व परिणामकारक असा आहे. ते कवीच्या निर्मल ईश्वरभक्तीची व उज्ज्वल स्वदेशप्रीतीची साक्ष देतात. या गुंजारवातील प्रेमळ भक्तिगीतातून " तव निवास जगत्प्रणामे " या व्यासोक्त्यनुसार जनांत वास करणाऱ्या जनार्दनास कवीनें आपल्या ललित पदांचित अशा सुरेल आलापांत व अंतःकरण पिळवटलेल्या अशा करुणविलापांत, राष्ट्रास स्वातन्त्र्य व तदंगभूत शांतिसुख मिळावें या सकाम परंतु उदात्त भावनेनें, शुद्ध व निर्विकार अशा नितांत प्रेमभावें आळविला आहे. वर्ण्यविषयाचें हुबेहुब चित्र डोळ्यांपुढें खडें करणारी प्रभावशाली व स्वभावरम्य

अशी साधी व सोपी अनुरूप शद्वरचना, आतून येणाऱ्या कल्पनाप्रतिभेशीं जोड देण्यास अकुंठित प्रवाहानें एकाद्या निरलस व एकनिष्ठ स्वयंसेवकाप्रमाणें या कवीच्या अगदीं अंकीत असलेली दिसते. हें भाग्य कवि ह्मणविणाऱ्या आधुनिकांत कित्येकांस नसतें. सामाजिक वर्णनाच्या भरात या काव्यात, मधून मधून दिसून येणारा शद्वविनोदही मोठा मार्मिक आहे. या कवीच्या शाहिरीगानात सहज भान हरवलेल्या रसिकाचें एकंदर काव्यातील भाषा व्याकरण वृत्त यातील शुद्धाशुद्धतेकडे तितकें सूक्ष्म अवधान रहात नाहीं हें स्वाभाविक होय. तथापि एखादा न्यायनिष्ठुर गुणदोष विवेचक असा भाषाभिज्ञ मार्मिक, प्रस्तुत काव्यास आपल्या दृष्टीचें गालबोट क्वचित् कोठें लावू पाहील अशी भीति वाटते. परंतु यदृच्छया जसजशी ज्या ज्या वेळीं स्फूर्ति होत जाईल, त्या त्या वेळीं स्वतःची कथनरचना करीत राहून त्या बरोबरच, प्राचीन व आधुनिक पुण्यश्लोक कवींच्या काव्य वाङ्मयाच्या परिशीलनाचाही हा कवि जर सदैव व्यासंग ठेवण्याचें मनात आणील तर, उत्तरोत्तर त्याची कृति भाषादृष्टयाही अधिकाधिक शुद्ध, अव्यंग व प्रौढ अशी परिणत होऊन तिला या महाराष्ट्र सारस्वतात कीर्ति व चिरायु लाभेल यात मला संशय नाहीं.

सोलापूर
२३।६।२६ } सदाशिव केशव श्रोत्रिय.

# अनुक्रमणिका

## गीत-गुंजारव


| कवितेचें नाव | पृष्ठ |
|---|---|
| १ सुस्वागतम् | १ |
| २ सुमनसंगीत | २-८७ |
| १९२० | |
| १ नमो मायभूमी | २ |
| २ माझें ध्येय | ४ |
| ३ हुरडा | ६ |
| ४ शेतकऱ्याचें गाणें | ८ |
| १९२१ | |
| ५ बालटिळक | १४ |
| ६ मुळशीचा पाळणा | २३ |
| १९२२ | |
| ७ कै. वारद | ३२ |
| ८ श्रीसत्यविनायक | ३३ |
| १९२३ | |
| ९ वारद गुणवर्णन | ४२ |
| १० सोलापूर-वर्णन | ४८ |
| ११ श्रीज्ञानेश्वर | ५२ |

१२ भेटेन नक्र महिन्यांनी ५४
१३ रत्नागिरी परिषद ६०

१९२४

१४ शिवराई ६५
१५ श्रीशिवछत्रपति ६६
१६ दावि रूप डोळा ७०

१९२५

१७ तानाजी मालुसरे ७३
१८ सावित्रीगीत ७८
१९ कै. सामन ८२
२० ज्ञानेश्वरीची आरती ८६

३ स्त्र-भाव-वासरी ८८ ते ११७

१९२४

१ पर्दाच्या पाडुग्या ८८
२ माझें चरित्र ८९
३ चिमणा शूर शिपाई ९०

१९२५

४ ओवाळणी ९१

१९२३

५ तरुण भारतास ९३

१९२२

६ व्यायाम ९५

७ बारशाच्या भगवतास ९७
८ सवाल ९८
९ गांधीगीत १०१
१९२१
१० चरक्याची चतुराई १ ३
११ स्वयंवर १०६
१९२०
१२ मागासलेल्यास १०९
१३ भारतास १११
१४ संध्या ११४
१५ नोकरशाहीची आरती ११६
१९२३–१९२५
४ **वीणालहरी** ( मेळ्यांतील १० पदें ) ११८–१२२
५ **नागरगीत** १२३–१३४
१ कधींरे अता भेटसी राम राया १२३
२ नाटक सिनेमा महात्म्य १२४
१९२२
३ गडे मज संगें घेउनि चला १२८
४ शहराचें सुख १२९
५ म्युनिसिपालिटीची आरती १३१
६ **वंदेमातरम्** १३५

॥ श्रीशंकर ॥



# गीत-गुंजारव.

## १ सुस्वागतम्.

( लक्ष्मीसमचचल )

स्वागत तव केंवि करूं सुवनसुंदरा
आला-ी अवचित घरिं जरि निरंतरा ॥ ध्रु ॥
गजबजलें सकल सदन स्थल नसे रितें
मति प्रियतम नाम गानिं अजुनि लाजले
हृदयभुवनिं ठेवित परि भीति वाटले
तूं प्रेमळ परमेश्वर
परि म्हणविशि चित्तचोर
मी-मजला मुकल्यावर
कुठला संसार सार
म्हणुनि नयनिं वास करीं मम मनोहरा ॥ १ ॥

—— :0: ——

# २ सुमन संगीत.

## १ 'नमो मायभूमी'!

भुजंग प्रयात

गुलाबी छटा पूर्वभागीं विराजे
निशानाथ हा भासतो हीनतेजें
वशा तारका लोपल्या सर्व व्योमीं
तुला सुप्रभातीं नमू मायभूमी ॥ १ ॥

प्रभातीं सुटे वायु हा मंदमंद
अहा कोठुनी येत आहे सुगंध
तुझ्या पूजनाचा असे कोण प्रेमी
तुला सुप्रभातीं नमू मायभूमी ॥ २ ॥

तुझ्या पूजनीं दक्ष निसर्ग आहे
म्हणूनीच हा मंद सुगंध वाहे
फुलें वाहिलीं भक्तिनें पादपद्मीं
तुला सुप्रभातीं नमू मायभूमी ॥ ३ ॥

तुझ्या भक्तिच्या तारका या भुकेल्या
जगीं पुष्परूपें म्हणूनीच आल्या
क्वचे भेट त्या राहती दूरधामीं
तुला सुप्रभातीं नमू मायभूमी ॥ ४ ॥

किती गोड हा जन्म या पाखरांचा
सुखाचा गुणाचाहि स्वतंत्रतेचा
तुझें गीत गाती मुदें ऐकतो मी
तुला सुप्रभातीं नमूं मायभूमी ॥ ५ ॥

नदी गात संगीत तव वाहतांना
तरू डोलती ऐकुनी दिव्यगाना
असें रंगलें सर्वही विश्व नामीं
तुला सुप्रभातीं नमूं मायभूमी ॥ ६ ॥

अम्हां देव तूं धर्म तूं मायभूमी
अम्हा स्फूर्ति तूं कीर्ति तूं मायभूमी
अम्ही ना कुणी सर्व तूं मायभूमी
नमो मायभूमी नमो मायभूमी ॥ ७ ॥

तेजोराशि सहोदरा दिनकरा साभाळ भूदेविला
झाली दीन कशी सदा यशशि कीं सर्वंश तू चांगला
हांसे पूर्वदिशा सुहास्य गगनीं शोभे प्रकाशापरी
ऐसें हास्य विभो कधीं नधिन मी या हिंदभूमीवरी ॥ ८ ॥

## २ माझें ध्येय

( सोलापूर येथील विसाव्या प्रांतिक परिषदेच्यावेळीं लेखक स्वयंसेवक असतां स्वतःशीं गुणगुणण्याकरितां लिहिलेलें गाणें. )

( उद्धवा शांतवन )

ध्येय एक निश्चित झालें
मी सेवक या राष्ट्राचा ॥ धृ ॥
ईशाची बहु दिवसाची । ही आर्यभूमि लडिवाळ
प्रेमानें सुखदुःखाचे । खेळली त्यासवें खेळ
सकटीं पाहुनी तिजला । प्रभु करी तिचा सांभाळ
भूभार हरण करण्याला
तो राघव रविकुलिं झाला
श्रीकृष्ण हंसुनि तिस वदला
कीं सेवक मी राष्ट्राचा ॥ १ ॥
सौख्याचा डाव हुडाला । अवकळा घरेला आली
पाहुनिया संकटकाला । भांबावुनि मग ती गेली
कळवळुनी अंतर्यामीं । प्रार्थिला तिनें वनमाळी
तो छत्रपती शिवराय
श्रीरामदास गुरुमाय
अवतरुनी वदले काय
कीं सेवक मी राष्ट्राचा ॥ २ ॥

मागुती पराभव झाला । रंगात भंग मग होई
संकटें ग्रासिलें तिजला । परि मानासि ग्लानी नाहीं
विश्वास प्रमुख्दीं धरुनी । प्रसवली पुत्र भूमाई
त्या लोकमान्य टिलकाला
वंदनीय गांधिजीला
अभिमान हेंच वदण्याला
कीं सेवक मी राष्ट्राचा ॥ ३ ॥

जन्मले आर्य भूमींत । ते बांधव सारे झाले
राष्ट्रीय प्रागतिक कोणी । विद्येंन मागसलेले
हा भेद कशाला करितां । बाहेरुनि कुणि का आले
तो असो कुणिही कसला
मी करीन तत्सेवेला
हा धर्मचि माझा ठरला
कीं सेवक मी राष्ट्राचा ॥ ४ ॥

या जनीं जनार्दन भरला । श्रीकृष्ण सखा भगवान
ना दिसे कळेना कांहीं । परि हृदया पटली खूण
प्रेमानें पूजुनि त्याला । पादीं देहसुमन वाहीन
हा स्वार्थधूप जाळून
ओंवाळुनि पंचप्राण
करि कुंजविहारी नमन
कीं सेवक मी राष्ट्राचा ॥ ५ ॥

---

## ३ हुरडा.

( राम-भजन )

शेत कणाचें पिकलें दुर्दिन हुरड्याचे आले ॥ ध्रु ॥

आनदानें हलती डुलती
काळ्या काळ्या रानीं
हिरव्या पिवळ्या ताटावरतीं कणसें गोजिरवाणीं ॥ १ ॥

सानथोर नादती सुखानें
सर्व अहोरात्र
कविहृदयातिल कधीं काळचें जगताचें जणु चित्र ॥ २ ॥

असल्यांतचि आनंद धावती न
नसल्याच्या पाठीं
परि बाबा रे जग हें नाहीं तुमच्या माझ्यासाठीं ॥ ३ ॥

काय पहा शूरत्व नराचें
किति निधडी छाती
रानगांवच्या राजावरती शस्त्रातें चालविती ॥ ४ ॥

दीन दुर्बळां पिळुनि काढितां
जन्म जिथें गेला
मुक्या जिवाचे मूक मनोरथ कसे कळावे त्याला ॥ ५ ॥

काळ्या शेतांतिल कणसांची
मान मोडतांना
दयाधर्म कधिं आठवतो का बेशरमी शूरांना ॥ ६ ॥

कुणी खोदिती कुणी जाळिती
तुडवितिही केव्हां
किति जन्माचा कुणास ठावा साधुनि घेती दावा ॥ ७ ॥

बलहीनाच्या दैवीं असती
कसे किती हाल
असेल ज्याला अनुभव ज्याला तयालाच समजेल ॥ ८ ॥

निर्जन वनिं जे नांदत होते
थडीवाग्यात
करुं तयांचि समाधि व्हावी मानव उदरदरींत ॥ ९ ॥

नको उगवणें नको वाढणें
नच कुरडा होणें
या नरपशुच्या खळग्यापायीं माती होउनि राहणें ॥ १० ॥

× × ×

पडलि. जगतां
खाता ॥ ११ ॥

## ४ येउं दे करुणा—( शेतकऱ्याचें गाणें )

( अधरिं धरि मुरली )

येउं दे करुणा
करुणा तुज आतां
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥ ध्रु ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀

येउं दे करुणा करुणा कसारी
सकटीं हतबल शेतकरी
येउं दे करुणा करुणा मनमोहना
मिळेना खायाला दाणा
येउं दे करुणा करुणा श्रीपती
उपाशी गाइगुरें मरती
येउं दे करुणा करुणा गोविंदा
बुडाला शेतकिचा धंदा
कोपली धरणी ही धरणी माता
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥ १ ॥

❀ ❀ ❀ ❀ ❀

आमुचें शेत हें चचप्राण
शोभते बहु हिरवें रान
वाटलें बघुन बघुन नोक शोक
कीं येइल खंडीभर पीक

येत पाऊस पाउस अवकाळी
पिकाची नासाडी झाली
किडे हो पडले पडले कणसात
जाहलें वाढ्क शेतात
निघेना दाणा बी–भरणा–पुरता
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥२॥

❀ ❀ ❀ ❀

आजवर होती ती मेहनत केली
सर्वही मातीमधिं गेली
दिवस असतात हे नांगरटीचे
घेतलें ऊन उन्हाळ्याचें
पेरणी केली केली अनवाणी
सोसुनी पाउस आणि पाणी
राखणीसाठीं पडलों शेतांत
एकला थाडित कुडकुडत
आस बहु होती परि बसला गोता
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥३॥

❀ ❀ ❀ ❀

भावकी माझी दुष्ट गावगुंड
जणूं का अग्नीचें कुंड
तयाला सहाय्य सहाय्य ते दोन्ही
गांवचे पाटिल कुळकर्णी

घातकी लोक लोका नच लाज
जाळितां कडब्याची गंज
मरां आहेत गाइगुरें ढो॰
घालुं काय हाड उगाळून
तुटे काळीज काळीज तथा पाहतां
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥४॥

❀ ❀ ❀ ❀

तगादा बसला रामोशी द्वारीं
सुकेना सारा सरकारी
जनावर घरचें करुनी अविचार
दाविला तयास बाजार
बनाला भुलुनी भुलुनी म्या विकिली
खाटिका हातीं सापडली
काय हें झालें झालें जगजेठी
कापिती तागोतीसाठी
पाप हें फेडूं फेडूं कुठें आतां
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥५॥

❀ ❀ ❀ ❀

मुक्या जीवांचा शाप मला भवला
सांपळा माझा अतरला
पाहुनी त्याला होतो सुखरूप
वाढत्या वशाचें रोप

आमला नहीं नाही दैवाला
नेति त्या रिपुंद मरतीला आ को

दूर देशात देशात युद्ध झालें
मुळावर माझ्या परि आलें
सावळा माझा झाला बेपत्ता
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥६॥

❀ ❀ ❀

सावळ्यासाठीं साठीं झुरझुरुन
आतसे हातास मरुन
मून सुंदर ती आली नवतीत
पोरगी रडाए कोपऱ्यात
सांवळा माझा गेला सोडून
राहिलें त्याचें रीण
काढुनी जप्ती जप्ति सावकार
तयानें नेलें घरदार
राहिलो आतां मी मरणा पुरता
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥७॥

❀ ❀ ❀ ❀

सावळ्या रामा का सोडुनि जागी
तुझ्याविण झालो परदेशी
सावळ्या म्हणती पुत्रहीन साचा
थेरडा ऐंशी वर्षांचा

सांवळ्या रामा बोल चाल कांहीं
कशीरे तुला दया नाहीं
सावळ्या रामा मजजवळी बस
एकदा मोठ्याने हांस
सावळ्या रामा ये सत्वर ये रे
तेवढें औषध पाजिव रे
सावळ्या रामा रूठ करि घाई
अजुनि तुज कसें कळत नाहीं
सावळ्या रामा बोलावी सकला
अता मज घोंगडिवर घाला
सावळ्या आण तुळशीचे पान
ह्मणारे हरीपाठ कोण
सावळ्या रामा नको, कुठें जाऊं
तुझी मज माडी दे पाहूं
सर्वही बोला राम राम आता
श्रीहरी सख्या जगन्नाथा ॥८॥

❀ ❀

×

शेतकरि लोक अजाण अति दीन
तयाला छळिती सर्वजण
भाडवलवाला करी सावकारी
तयाचा जन्माचा वैरी

देउनी पाच   दहा लिहुनि घेतो
        शेवटीं दसपट धन नेतो
कधीं कधिं येती   कोणी अधिकारी
        लावविति कडबा आणि ज्वारी
वेठिला धरिती   गाड़ी हा घरचा
        जणू कां मत्ता बापाची
एक ना दोन   साधू किति हाल
        बाप हो दाद कधीं घ्याल
सकटीं रुतला   शेतकरी अधुला
        जगाचा हा पालनवाला
प्रसंगी समजा   बुडेल जरि शेती
        खाल काय धोंडा आणि माती
दिसेना कोणी   कोणी या समयीं
        आमुची रक्षिल भूमाई
तुझ्याविण वाली   नाहीं भगवंता
        कुंजविहारी जगन्नाथा ॥९॥

# ५ बाळ रसिक

चाल:—( धन्य शिवाजी. )

दिव्य दिवाकर संध्यासमयीं अस्ताचलिं गेला
परमेशाचा विश्वसृजन होता शिणलेला
पक्षांचा किलकिलाट चाले झाडाझुडपात
संध्यासमयीं संध्यावंदन करिती जणु संत
गोकुळवाडा हा गजबजला गाइवांसरांनीं
गेलीं होतीं प्रभातकालीं चरायास रानीं
गरिब घरची गृहलक्ष्मि त्या शुद्ध करुनि ज्योती
देवासंनिध दीप लावुनी वंदन करिताती
घरचे घरधनि दमुनिभागुनी गृहासि जंव आले
बोल मधुर बाळाचे ऐकुनि शीण सर्व हरले
चकाकणाऱ्या तारकालिका आकाशीं येती
कोठुनि आल्या कुणा न ठावे प्रभातिं कां जाती
शुभ्रचंद्रमा मेघामागें झाला जंव गुप्त
कोठें गेला ह्मणुनि तारका होती भयभीत
मेघामागुनि हळूंच येतां पाहुनि चंद्राला
संकेतानें एकमेकिला सांगति त्या बाला
आकाशांतिल या खेळाचा आणुनिया भाव
अनुकरणप्रिय मुलें खेळती येथ लपंडाव ॥१॥

रात चांदणी असे अंगणीं रहाट घेवोनी
सूत काढिते तेथिल घरच्या गजाची राणी
पुराणातली पुनःपुराणीं भारतीय गोष्ट
सांगत होता राजा घरचा अर्थ करुनि स्पष्ट
खेळ संपले धावत आलें बाहेरुनि मूल
दंपतिपत्नीच्या प्रेमलतेवर फुललेलें फूल
बोल बोलले बाळ समुख तें गोजिरवाणें
बाबा बाबा आईस येतें टिळकाचें गाणें
पुन्हा एकदा बाबासाठीं ह्मणेनास का गे
शब्द ऐकतां जननि तत्काळ बळेंच भरि रागें
टिळक कोठचा होता कैसा कोठिल देशाचा
महाराष्ट्राचा कीं कोंकणचा हिंदुस्थानाचा
साधू होता काय तयानें केला उपकार
लोकमान्य त्या ह्मणुनी करती का जयजयकार
हनुमतापरि भीमपराक्रम त्यानें का केला
श्रीकृष्णापरि युक्तिकथा का त्यानें सांगितल्या
तुमची बाबा टिळकासह कधिं झाली का भेट
कैसा होता कोमलहृदयी अथवा रागीट
स्वदेशभक्ती कशी करावी स्वदेश कोणाचा
तुमचा माझा कीं टिळकाचा परक्या लोकांचा ॥२॥
सद्गदकंठें परि उत्कंठें धरुनि बाळकास
पिता सांगतो आर्यभूमिचा सोपा इतिहास

परि दैवानें सुखात त्यांच्या कालविली माती
मायबहीणी दीनावाणी मजूरीस जाती
शेत पिकेना दुष्काळाची वरचेवर फेरी
रोगराइही मधुनी मधुनी कहर करी भारी
कष्ट आमुचें लाभ दुज्याला उलटा व्यवहार
अजुनी असली बाळ सानुल्या कसें समजणार
गरीब अथवा मध्यम कोणी धनाढ्य जरि असले
हें दास्याचें शल्य श्रोंवतें अंतःकरणाला ॥५॥
पाप्याचा घुडावा पाहुनि धरणी हैराण
नेणो कितीकवेळां रडली धाय मोकलून
कळवळला करुणाघन आला धावत हांकेला
पुंडलिकानें अपुल्या पाठीं ज्यास उभा केला
आर्यभूमिच्या उद्धाराचा धरुनी हव्यास
अमरपुरीचा आत्मा येई जन्म घ्यावयास
तापसियांचें बहु दिवसांचे पुण्य फळा आलें
परदास्याचे खडे खाउनी होतें आचरिलें
रत्नखनी रत्नागिरि झालें सार्थक नामाचें
सतपुरीसम स्मरण करावें गावे गुण याचे
गंगाधरकुलतिलक जाहला तिलक आर्यभूला
सन अठराशें छप्पन सालीं जन्माला आला
धन्य माउली धन्य जनक तो प्रसवे हा बाळ
सज्जन मनि कनवाळू मासे पाप्यांला काळ

स्वातंत्र्याची गुढी तया दिनीं उभारली होती
दिसली नाहीं कोण पहातो आकाशावरती
सुवासिनी बहु आनंदानें गाउनिया गीत
शुभदिन पाहुनी नाम तयाचें ठेविति बळवंत
सामर्थ्यानें अपुल्या ज्यानें स्वदेश गाजविला
धन्य माउली जिनें तयाला पाळणिं हालविला ॥ ६ ॥
जननी जनका तोषविलें बहु बालक असतांना
बाळ्यांतल्या चिमण्यासंगे हसे खेळतांना
कीर्ति जयाची दाहिदिशांच्या गेली भेटीला
रांगत असतां कितीकवेळां अडखळुनी पडला
आनंदाचे बहु मौजेचे बोल अर्थहीन
जन्माचें परि सार्थक झालें वाटे ऐकून
बोल बोबडे श्रवणीं पडले अमोल मोलाचे
भाग्यवान् कुणि असतिल जगतीं त्याच्या तोलाचे
नमो कितीकवेळां घेती पापा सुदरसा
देवाघरचा ठेव लाधली वाटे त्या सहसा
स्वातंत्र्याचा धडा जयानें सांगितला आम्हां
बाळपणामधिं बापासंगे शिकला ओ ना मा
हंसला रुसला खेळ खेळला मुलांलेकरात
सुखदुःखाला विसरुनि जाणें पोराची जात
बुद्धिवान बहु अनेक विद्या पारंगत झाला
वाटे होता मागिल जन्मीं शिकुनीच आला

पोहणाराही उत्तम होता करि व्यायामानें
' देहबलानें बुद्धिबलाला शोभा बहु येतें "
बालपणीं जें वाटत होतें बालक सामान्य
जनहृत् सिंहासनी विराजे आज लोकमान्य ॥७॥
तारुण्याची फुटे पालवी वृत्ती बावरली
माझ्या देशा तुला कशानें हीन दशा झाली
जातिभेद कुणि साक्षरता कुणि देव म्हणत होते
टिळकाला तें खरें वाटलें विचार परि कोते
स्वतंत्रता हा टिळका वाटे राष्ट्राचा प्राण
जाळायाच्या उपयोगाचा देह प्राणहीन
तेहतिस कोटी लोकावरती परक्याचा सत्ता
या गोष्टीतें जगात म्हणती बाळा परवशता
उद्योगाची वृद्धी नाहीं दरिद्रता जाचे
परकी सत्तेखालीं बाबा असेंच व्हायाचें
देह दुज्याला विकिला मुकला तो निजसौख्याला
चान्यासाठीं बैल राबतो गोणी दुसऱ्याला
सत्ताधारी सुखी नांदती कां अमुची दैना
रक्षणकर्ता ईश्वर त्याचा दुसरा नाहीं ना
सत्ताधारी नव्हेत कोणी देव साधु संत
मनीं आणिता त्यासम होऊं आम्ही बलवंत
सत्ताधारी अधिकाऱ्यावर नुरला विश्वास
स्वतंत्रतेचा महामंत्र मग कथिला शिष्यास

'स्वराज्य आहे जन्मसिद्ध मम हक्क मिळवणार'
सत्याचा परमेश्वर वाली सहाय्य करणार ॥८॥
पत्र केसरी करी गर्जना प्रति मंगळवारी
अमंगलाचे वाटेकरि नच याचे अधिकारी
चैतन्याची ज्योत पेटवी केसरि जनतेंत
परि भासला सरकाराला राजद्रोह त्यात
स्वतंत्रेची दिव्यगर्जना होइल का पाप
परंतु वळला नाहीं सहसा दयाळु माबाप
देउनि शिक्षा मंडालेला पाठविले बाला
भगवद्गीतारहस्य ग्रंथा जन्म जिथें झाला
बाल लाडका पाहिलात का म्हणुनी हंबरली
आर्यभूमि ही तेव्हा ( आता हतभागी ठरली )
किती छळियले किती दुखाविले कटु बोलुनि बोल
काकांच्या दरबारीं ठरतो हंस हीनमोल
श्रीकृष्णाचा जन्म जाहला कुठे तुरुंगात
श्रीरामानीं रावण वधिला परि वनवासात
शिवसंभाजी बंदीमाजी लिहिले इतिहासीं
शिवरायानें यवन ठकविला होवुनि सन्यासी
स्वातन्त्र्यास्तव सिद्ध होति जे वेंचाया प्राण
कारागृह जणु त्या वीरांचें विश्रांतिस्थान
तेथुनि सुटला फिरुनी उठला देश जागवीत
स्वतन्त्रतेची प्रभातकालिन भूपाळी गात ॥९॥

काळा डगला पाहुनि डोळा कप सुटे ज्याला
सरकाराला ह्मणतो कारे न्याय कसा केला
हे राष्ट्राचे सामर्थ्याचे विचार बनलेले
पाहुनि वाटे आवताराचे कार्य सफल झाले
स्वतन्त्रताही ज्याची त्याने स्वत च मिळवावी
गुरुजन ह्मणती केवळ आह्मी वाट दाखवावी
सत्याग्रह शक प्रथम प्रतिपदा आगष्ट पहिलीला
एकोणिसशें वीस मनामधिं सपविली लीला
देह जगाचा जगात होता जगात ठेवियला
टिळक आमुचा बाप दयाळू देवाघरिं गेला ॥१०॥
स्वदेशभक्ती सदा करावी स्वधर्म पाळावा
परोपकारी नित्य झटावें धन्यवाद घ्यावा
साधी राहणी कधी न घ्यावा तो परकी माल
परकी मालापायीं बनला स्वदेश कंगाल
सज्जन सगे प्रेमळ देणें ठोश्याला ठोसा
ही टिळकाची शिकवण याला विसरु नये सहसा
आत्मोन्नतिसह स्वदेशोन्नती यायोगें होय
चालत आला पुढें चालतो टिळक सांप्रदाय ॥११

## ६ करि बाळा जो जो गाई.

( मुळशीचा पाळणा )

( अजि अङ्कुर हा )

सुकुमार सख्या, नीज आतां लवलाही ।
करि बाळा जो जो गाई ॥धृ०॥
वद वेल्हाळा काय हेतु मनिं धरिशी ।
मम उदरीं जन्मा येशी ॥
या अवनिमधीं दुज्या शेकडों माता ।
तुज नव्हत्या कां गुणवता ॥
कुणि सरदाराची नारी
अति भाग्यवती सुकुमारी ।
येतास तियेचे उदरीं ।
तरि जन्माचें सार्थक होतें काहीं ।
करि बाळा जो जो गाई ॥१॥
अति हर्षभरें सौख्य भोग भोगाया ।
येशी काय अवनिवरि या ॥
परि गोजिरीया विपरित अनुभव आला ।
जन्मताच तुजला असला ॥
तुज झोंपे उघडा वारा ।
वरि पर्ज्यन्याच्या धारा ।
झाडाविण नाहिं निवारा ।

तव टाळूला तेल मिळालें नाहीं ।
करि बाळा जो जो गाई ॥२॥
तव जन्माचा बारावा दिन साचा ।
पाळण्यांत निजवायाचा ॥
घरिं जमउनिया इष्टमित्रगणगोता ।
उत्सव बहु केला असता ॥
तव नामकरणसमयाला ।
बहु सुवासिनींचा मेळा ।
गातांना असता दिसला ।
कुणि गोविंद घ्या, गोपाळ घ्यागे, बाई ।
करि बाळा जो जो गाई ॥३॥
चल ओढ्याचें पाणी हें खळखळतें ।
म्हाणीन तुला मी तेथें ॥
मग निजवुनिया जुन्या चौघडीवरती ।
पायाची लाविन माती ॥
कां हससी वेड्या बाळा ।
खेळाचा घेसी चाळा ।
होईल दृष्टि मम तुजला ।
तुज दुःस्थितिची कल्पनाहि कांही नाहीं ।
करि बाळा जो जो गाई ॥४॥
मग झाडाच्या बांधुनि फांदीवर ।
त्या सुडाशाचे दोर ॥

करि धोंगडिची करुनि छानशी झोळी ।
निजविला बाळ त्यावेळीं ॥
कौतुक बहू परि करितें ।
वनवासीं वैभव नसतें ।
कर्मांची कहाणी गाते ।
वनदेवींनों, हलवा या लवलाही ।
करि बाळा जो जो गाई ॥५॥
अम्हि मुळशीचे राहणार पूर्वींचे ।
विख्यात मावळे कुळिंचे ॥
घरदार अम्हा सर्वहि काहीं होतें ।
परि दैवच अनुकुल नव्हते ॥
होतें तें नव्हतें झालें ।
नव्हतें तें नशिबीं आलें ।
परदेशि अम्हाला केलें ।
नच टाटा हा काटा खुपला हृदयीं ।
करि बाळा जो जो गाई ॥६॥
तव जनकाच्या जन्मभूमिचें खेडें ।
स्मरता मन होतें वेडें ॥
त्या ओढ्याच्या कांठीं गांवापुढती ।
आमुची जिराइत होती ॥
टुमदार लहानसें घर तें ।
वृंदावन दारापुढतें ।
गवताचें छप्पर भवतें ।

मी गाइगुरें बांधितसें त्या ठायीं ।
करि बाळा जो-जो गाई ॥७॥

त्या मुंबइच्या धनिकवणिक लोकाला ।
श्रीमान अधिक करण्याला ॥
कुणि अशापरी गोरगरिब जे असती ।
त्या अधिक भिकारी करिती ॥
मुळशीची सुपीक शेती ।
बांधुनी धरण त्यावरती ।
करु ह्मणती विजलीवरती ।
हो अनर्थ हा श्रीमतीचे पायीं ।
करि बाळा जो जो गाई ॥७॥

गांवात नुरे बसावयाला घर हो ।
रानांत शेत नाहीं हो ॥
पैपैसा जे देतिल तितुके घ्यावे ।
देशोधडि होउनि जावें ॥
वाताहत विपरित ऐशी ।
पाहवे कुणाला कैशी ।
हें सकट बारायांशीं ।
क्रमप्राप्त अशा सत्याग्रह हा होई ।
करि बाळा जो जो गाई ॥८॥

तें नसलेलें स्वराज्य शिवरायाला ।
मावळाच देऊं सजला ॥

परि असलेलें घरदारहि आजि त्याचें ।
नाहींसे होतें साचें ॥
काळाची विपरित करणी ।
सर्कशींत सिंहा धरुनी ।
चकरीसह पाजिति पाणी ।
या दैवाचा ठाव कळेना कांहीं ।
करि बाळा जो जो गाई ॥१०॥

घरधनी सुखें सत्याग्रह करितांना ।
कारागृहिं नेलें त्यांना ॥
हे दाटाचें गुंड रानवट बाई ।
माणुसकी त्यांना नाहीं ॥
होवोनि नग्न मज पुढती ।
मम उरोभाग करिं धरिती ॥
अति कामुक चेष्टा करिती ।
स्त्रीजातीची विटंबना अशी होई ।
करि बाळा जो जो गाई ॥११॥

कुणि नव्हत्या का आयाबहिणी त्याला ।
अब्रूवरि घालिति घाला ॥
ही सरकारी न्यायदेवता रुसली ।
धरणामधिं जाउनि बसली ॥
पाहुनि हा अत्याचार ।
अधिकारयुक्त सरकार ।
मेतापरि पडलें गार ।

हतदैवि अशा वाली उरला नाहीं ॥
करि बाळा जो जो गाई ॥१२॥
कधिं नव्हता तो बंदिवास हा घडला ।
हृदयाला धक्का बसला ॥
तव जनकाच्या आयुष्याची दोरी ।
त्या मुळेंच तुटली सारी ॥
ही कुऱ्हाड आकाशाची ।
कोसळली मजवर साची ।
परमावधि दुर्दैवाची ।
अशि झालीरे झाली ताणू काई ।
करि बाळा जो जो गाई ॥१३॥
दो महिन्यांची गर्भवती मी होते ।
पति गेले स्वर्गावरते ।
घरिं नोटाचें पुडकें होतें एक ।
घातकी अपेशी देख ॥
घरदार नाहिंसें झाले ।
सौभाग्य हिराउनि नेलें ।
अपरात्रीं तस्कर शिरले ।
मज बांधुनिया पुडकें नेलें तेंही ।
करि बाळा जो जो गाई ॥१४॥
मी मरणाचा विचार होता केला !
विपरीत मार्ग परि गमला ॥

दो जीवांचा भार मजवरी होता ।
परि सुटका झाली आता ॥
तुज साठीं होतें जगलें ।
तुज प्रभुच्या स्वाधिन केलें ।
मरणासि सिद्ध अजि झालें ॥
ये शेवटच्या सुंदर पापा देई ।
करि बाळा जो जो गाई ॥ १५ ॥
ही परस्थाची दिसत दुनिया सारी ।
परि माझें बाळ भिकारी ॥
तुज हक्काची तिळभर जागा नुरली
दैवात मजूरी लिहिली ॥
नच तात पाहिला नयनीं ।
या असल्या खडतर रानीं ।
चाललें अजि तुला त्यजुनी ।
मी राक्षसिणी नव्हे नव्हे तव आई ।
करि बाळा-जो जो गाई ॥ १६ ॥
नउ दिवसाचा ताप अंगीं फणफणतो ।
उठताना झोका जातो ॥
मम जीवाचे जिवलग नुरले कोणी ।
करितिल जे औषध पाणी ॥
शमवाया चिमणीभूक
हें बोट मधाचें चोख ।
हृदयाची झाली राख ।

म्हणुनीच सख्या पान्हा फुटला नाहीं ।
करि बाळा जो जो गाई ॥ १७ ॥
यापुढति तुला रक्षिल धरणीमाता ।
आळवी मनीं भगवंता ॥
या वाटेनें येतिल जातिल कोणी ।
जे उदार बंधूभगिनी ॥
मुळमाता मजला द्या हो ।
बाळाला सांभाळा हो ।
येवढी भीक घाला हो ।
हे परदेशी पोर वाहिलें पायीं ।
करि बाळा जो जो गाई ॥ १८ ॥
व्याकुळ सख्या, जीव जाहला फार ।
संपला सर्व संसार ॥
मज विसरं नको हतदैवी तव माता ।
जग सोडुनि जाते आतां ॥
परि आस अंत समयाची ।
तव जनकाची, मातेची ।
पुरवावी बाळा साची ।
तू दादाच्या चाकरींत नच राही ।
करि बाळा जो जो गाई ॥ १९ ॥
स्तन बाळाच्या मुखात देते माता ।
पान्हा जरि फुटला नव्हता ॥

किंचित् वेळ तरी मुलाकडे ती पाही ।
शेवटचें चुंबन घेई ॥
पाळणीं बाळ निजवीत ।
जोडुनिया दोन्ही हात ।
एकदाचि वरती बघत ।
मग निजली ती पुनरपि उठली नाहीं ।
करि बाळा जो जो गाई ॥ २० ॥
वनि फिरतांना वैतागुनि जीवाला ।
रोदनध्वनि कानीं पडला ॥
हें परदेशी पोर नयनिं पाहून ।
कळवळलें अंतःकरण ॥
मनिं सकट पडलें भारी ।
वरळापरि मीहि भिकारी ।
करि सवाल कुंजविहारी ।
" है धर्मात्मा पालनवाला कोई " ।
करि बाळा जो जो गाई ॥ २१ ॥

# ७ कै० श्री० अप्पासाहेब वारद

## ( राम भजन. )

सुखकर हा सकलांना । गावूं, सजन गुणगाना ॥ ध्रु ॥
पुण्याईचा सद्भावाचा वारदवंशाचा ।
कुलदीपक मल्लप्पा झाला धन्य जन्म हा त्याचा ॥ १ ॥
सद्धर्मी दृढ भक्ति बाळगी राहणी बहु साधी ।
दया धर्म जणु व्यसन तयाला जडलें जन्मा आधीं ॥ २ ॥
धन-यौवन-संपन्न वयामधिं नीतिनिपुण राही ।
हजारांत एखादा ऐसा मिळेल किंवा नाहीं ॥ ३ ॥
कृषिकर्मी उद्यमीं आवडी धरुनी बहुसाल ।
यशसंपादनिं कधिंहि तयानें मुळिं न दवडिला वेळ ॥ ४ ॥
सत्वशील सज्जनीं लीन जनिं समतेनें राही ।
संकटकाळीं कधिंहि तयानें धैर्य सोडिलें नाहीं ॥ ५ ॥
उदार बहु गुणनिधि गुणज्ञा आश्रयही झाला
हीन दीन दुबळ्यांच्या रक्षणिं मायबाप जणु गमला ॥ ६ ॥
पुण्यशील परमात्मभक्ति नित आचरि नेमानें ।
जडदेही जाउनी राहिला अजरामर कीर्तीनें ॥ ७ ॥
असेलना पाहिला तुम्हीं हो वारद सर्वांनीं ।
डोळ्यांमधलें दृश्य माझिया वदेल कैसें गानीं ॥ ८ ॥
श्रेष्ठ गुणी मंडित जी दिसते वर्णुनि ती वस्तु ।
कुंजविहारी करी सुमन हें श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ९ ॥

———:❀:———

## ८ श्रीसत्यविनायक

चालः—( धन्य शिवाजी. )

गणरायाला प्रथम नमावें प्रेमें सद्भावें
आत्मोद्धारा गुण वर्णावें नाम मुखीं गावें ॥ धृ. ॥
प्रणवरूप परमात्मा शोभे कैसा साकार
निराकार साकार सारिखा हा जगदाधार ॥
सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची नुरवी
भक्त मनोरथ हा गणनायक प्रेमानें पुरवी
दुष्टाचा संहार कराया चार हात धरिले
पाशांकुश आणि परशु त्यासवे त्रिशूलही वरिले
भक्तांचा अपराध साठवुनि लंबोदर झाला
गवताच्याही काडीवरती प्रसन्न भक्ताला
साधीभोळी माय अंबिका तात शंभु भोळा
भोळ्याचें संतान गजानन प्रिय मोदक त्याला
मंगलउत्सव तुझा मोरया यश दासा द्यावे
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ १ ॥
गजासुरानें कहर मांडिला अवनी घाबरली
जात लपाया रसातळीं तीं खिंडारें पडलीं
गोब्राह्मण आणि संतसज्जनां काळ कठिण आला
सत्पुरुषांचें नशीब खडतर सुख नाहीं त्यांला

दुष्काळाची कदर कशाची असुरा नच रती
मानव भक्षिति अस्थिहि त्यांच्या चघळुनिया खाती
गाय धरावी उभी चिरावी मुखांत घालावी
उरलें सुरलें रक्त पिउनिया वरि ढेंकर द्यावी
असुरानीं जग असें गांजिलें उपाय नच पुढती
जसे फुटाणे धडपडती परि अग्नींतचि पडती
दीनदयाळा धावुनि यावे स्वस्थ न बैसावे
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ २ ॥
असुराचा संहार कराया शिवशंकर सजला
गोमातेचा पुत्र इमानी वृषभ सिद्ध झाला
वृषभावरती बसुनि सदाशिव शंखनाद स्फुरितो
गजासुराच्या वधार्थ शिवगण सिद्ध पहा होतो
भोळा शंकरकी जय म्हणुनी गर्जति शिवदूत
जयजयकारें कैलासासह अंबर दुमदुमत
रागद्वेषविरहीत शिवाला कोप कसा आला
गजासुरा अवदसा कशी ही आठवली तुजला
भोग आपुल्या कर्मांचें फळ दोष तुझा नाहीं
जो चढतो तो पडतो उक्ती असत्य नोहे ही
उन्मत्तांनीं दीनदुर्बळा पायिं नच तुडवावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ ३ ॥
प्रदोषकाळीं निघे अंबिका गंगास्नानाला
घरीं नाहिं कुणि शंकर शिव दूर रणांगणीं गेला

अंगीची उटि काढुनि त्याचा पुतळा बनवीत
तीच मुद्रा हो रम्य साजिरी गणपतिची मूर्त
सजीव झाला बोलु लागला मातीचा पुतळा
अशक्य हें तरि कसें ह्मणावें जगन्माउलीला
अघटित घटना कशी असे हीं तिचें तिला ठावें
कस कळावें आणि तियेला कुणी विचारावें
वदे अंबिका बाळराजसा गोष्ट ऐक माझी
गंगास्नाना जात असे मी शुभपर्वणि आजी
लाडू मोदक तुजला देतें गोडगोड खाया
नागभूषणें हीं घे सारी तुजला खेळाया
हिरवी हिरवळ अशी उगवली द्वारामधि तेथें
बैस घडीभर स्नान करुनि मी इतुक्यातचि येतें
मिहूकासह खेळ खेळण्या दूर नको जाऊं
कैलासावरि परका कोणी येउ नको देऊं
ऐसें ह्मणुनी आणुनि ठेवी पंचखाद्य ताट
त्वरे अंबिका चालू लागे गंगेचा घाट
मंगलमूर्ती असा स्थापिला द्वारी सद्भावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावे ॥ ४ ॥
दो घटकेचा बाळ जगाचा अनुभव त्या नाहीं
काका मामा सर्व काय ती एक तथा आई
सखासोयरा माहित नाहीं आईवाचून
धर्म काय तो एकचि उरला आईचें वचन

कैलासावरि अता एकला एक तोचि होता
जगदंबेचा पुत्र ह्मणुनियां तयाचीच सत्ता
आयुष्याचें ध्येय तयाचें एकचि ठरलेलें
परक्याला मुळिं येउं न देणं प्राण जरी गेले
ध्येयासाठीं प्राण गमावुनि चिरजीव होती
अनादिकालापासुनि चाले थोराची रीती
स्वकीय वा परकीय भेद हा त्याला नच ठावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ ५ ॥
कर्माचें विंदान वेगळें कळें न कोणाला
गजासुराला वधुनि सदाशिव परतुनिया आला
जयजयकारें सर्व गर्जती शखभेरि होत
हरहरहर महादेव बोलुनी नाचति शिवदूत
आरति घेउनि ओवाळाया येइल जगदंबा
ह्मणुनि सदाशिव द्वारमंडपीं राहे क्षणिक उभा
गडबड कसली ह्मणुनि मोरया खालति जब पाहे
शिवदूताचा मेळा तव तो वरति येत आहे
ठाणमाण मांडुनी सज्ज तो बाल ब्रह्मचारी
प्राणावरती उदार बनुनी उभा महाद्वारीं
तात तुझा हा असे सदाशिव कुणि त्या सांगावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ ६ ॥
कोण मुला तूं इथें कसा तू नांव तुझें काय
जगदंबेला मी आलों हें वृत्त सांग जाय

सगुण मनोहर रूप पाहुनी मनिं माझ्या येतें-
तुझें मजसवें खचित असावे काहीं तरि नातें
बोल बोल राजसा बोल रे एक बोल बोल
मागशील तू देइन तितुकें बोलाचें मोल
ये माडीवर बैस माझिया सुंदरसा पापा
देशिल का रे पुरुषाहुनि जो स्त्रियास बहु सोपा
का न बोलसी घाबरलासी पाहुनि का मजला
चल जाउ दे वाट सोड मज शीण फार आला
सदाशिवाचे बोल मोरया एकुनिया घ्यावे
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावे ॥ ७ ॥
कुणापुढें तू करिसी जोग्या विचारपुस असली
वैराग्याला उठाठेव ही कोणी सांगितली
माता माझी मी मातेच्या प्रीतीचा बंदा
वचन तियेचे प्रतिपाळावें हा माझा धंदा
तिनेच केला स्वाधिन माझ्या प्रदेश हा सारा
परकी प्राण्या येसी तैसा जा रे माघारा
आकाशाचा धरणी घेते जेथें ही भेट
या देशाची लांबीरुंदी मोजुनि घे थेट
त्या शेषाच्या मस्तकिं लिहिली खोलीची गणती
नक्षत्राला विचार जाउनि उंची तुज किती
आज्ञेवाचुनि अन्य प्रदेशीं चोरानीं यावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावे ॥ ८ ॥

तू परक्याचा हेर कुणी वा चोर असावास
वेषावरुनी संशय मजला येत असे खास
बहुरूपी तूं हेर चोर वा कुणि जादूगार
काय हेतु मनिं मजला दिशाविशि बोलुनियां मधुर
कपटपटूंच्या मधुरवाणिमाधिं जलाल विष असतें
इतुक्यांतचि वध मजला सारे नाग म्हणत होते
सत्य असो वा असत्य त्याचा अनुभव मज नाहीं
परकी प्राण्या येथुनि सत्वर नीघ अतां जाई
पुरे जाहले घेउनि जा रे हें विपरित सोंग
माता येतां होइल माझ्या वचनाचा भंग
ऐक जोगड्या समजावुनि तुज कुठवर सांगावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ १ ॥
हंसुनि सदाशिव बोले तेव्हां बाळा गुणवंता
हट्ट तुझा हा पुरे करी वा जाउ दे आतां
जगदंबा तव माय तिचा मी नाथ महादेव
तात तुझा हा प्यारे लडके अब जाने देव
कृष्णवर्ण मी भस्मलेपनें तुज दिसतो गोरा
संशय स्वमनीं आणु नको रे वाट सोड पोरा
शिवदूतांमधि गणाधीश ही पदवी देईन
सुरवरमंडाळीं प्रथमपूजनीं अर्पिन तुज मान
हट्ट पुरे हा लाल न देई वाट मोड बाळा
क्रोध अनावर त्यांतुनि मजला शीण फार आला

हट्टामदेंरोण करुनी मरणा का स्वीकारावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ १० ॥
जगदंबेचा देश तिचा मी रक्षक असतांना
परकी प्राण्या येउनि कैसा घालिसि धिंगाणा
सबलें तूं केलसाचें राज्य घेउं पाहसी
स्वातिक याहुनि बरा असे हा अनुभव गाईसी
मरणाचें भय मला दाविशी काय ह्मणुनि नीचा
मृत्यूला प्रियमित्र मानितो शूराचा बच्चा
मोह पाडुनी ढळवूं पाहसी काय सत्यनिष्ठा
सत्यावांचुनि प्राणधनाला मानिन मी विष्ठा
निःशस्त्रावरि नीचा करिशी शस्त्राचे घाय
नसो जनाची परी मनाची लाज नुरलि काय
जीव अगोदर घे हा माझा मग जा तुडवून
मरतां मरतां समाधान मी मानुनि घेईन
सत्याग्रहव्रत आचरितांना योग्य गमे मरणें
सत्यावांचुनि एक क्षणही निंद्य निंद्य जगणें
सत्यासाठीं काळ निमाला कळेल अवेला
अर्की घेउनि अश्रुजलें मम न्हाणिल देहाला
सांग याहुनी श्रेष्ठ कोणतें भाग्य असें उरलें
अपेक्षांसही अनुपम यश मज अवचित सांपडलें
सत्याग्रह मज तारक होइल कळेल तुज बरवें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावे ॥ ११ ॥

सदाशिवाचा क्रोध अनावर त्यांतुनि शिणलेला
भवीतव्यता अशा प्रसंगीं भ्रम पाडी त्याला
शस्त्र घेउनि धावुनि जातो बाळावर शिव तो
पुत्रवधास्तव तात सदाशिव सिद्ध पहा होतो
हाय हाय हे शंभु शंकरा घोर कर्म केलें
शस्त्राघातें शिर बाळाचें नभि उडुनी गेलें
गजासुराला वधिलें ह्मणुनी आनंद मानावा
पुत्रवधास्तव अथवा सांगा दोष तुह्मा द्यावा
घड घडपडतें सत्याचें मज फळ सांगा ह्मणुनी
अपेशांतलें यश सत्याग्रह हें कळवा कोणी
येत अंबिका काय तियेला आतां सांगावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ १२
रडे अंबिका मांडीवरती घेउनिया मूल
महादेवजी का कुसकरिलें हें माझें फूल
तनूलतेवर याच माझिया होतें फुललेलें
क्षणांत होतें परि नाहींसें कैसें हो झालें
महादेवजी फूल जिवाचें डोलत का नाहीं
गुणी बाळ अनबोळ मजवरि का रुसला बाई
कळवळला मनिं महादेव करि आज्ञा दूतांसी
जा रे सोर सर्व दिशेला शिर शोधायासी
त्रिभुवन सारे जरी शोधिलें शिर गवसेना हो
गजासुराचें शिर जोडुनी मग सजीव केला हो

मंगलमूर्ती गजाननाला भावें वंदावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ १३ ॥
ऋद्धिसिद्धिचा दाता गणपति जन सारे ह्मणती
कार्यारंभीं नमू तयाला कार्याच्या अंतीं
वंदनीय ज्यामुळें जाहला जगिं या गजवदन
तो सत्याग्रह करो जनाचें सदैव कल्याण
गणरायाचा हा पोवाडा सकला प्रिय व्हावा
शूर वीर सच्छील जनानीं ऐकावा गावा
बलहीनाच्या कानीं पडतिल शब्द जरी कांहीं
विसरुनि जारे लाभ तुह्माला यापासुनि नाहीं
भारतभूमी परवशतेनें झाली बेजार
आर्यमनोमंदिरीं मोरया घे झणि अवतार
कुंजविहारी गजाननाला विनवि मनोभावें
आत्मोद्धारा गुण वर्णावे नाम मुखीं गावें ॥ १४ ॥

## २. वारद-गुण-वर्णन.

( चालः—दो दिवसाची )

सुजनचरित्रें परम पवित्रें मंगलदायक अवनिवरी ।
वारद-गुण-वर्णन हे गाइन सख्या सजना हृदयीं धरी । ध्रु ।
उदार सज्जन रसिक महाजन कविकिंकर करि नमन तुह्मा
तुह्मासमचि ता खास असावा सगुण स्वरूपी परमात्मा
भारतभूमी करुनि दंडवत सद्भावें तुज विनवीत
सत्पुत्राच्या तुझ्या सत्कथा ऐकाया क्षण दे चित्त
सोलापुरची शोभा सुंदर जसा भरजरी मंदील
बारा वर्षांपूर्वि हरपला हिरा येथला बहुमोल
जया आठवुनि लोकमान्यही मंडाल्यामधिं हळहळले
नाव गाव पाहिजे कशाला वारद ह्मणता सर्व कळे
भक्त भागवत वीर धुरंधर थोर महात्मे मुत्सद्दी
आळीसाठी यशावाळची गरज भासली कुणा कधीं
वीरशैव कुलदीप मनोहर प्रकाश खुलला रम्य अती
मल्लाप्पा शुभनाम शोभतें आप्पासाहेब जन ह्मणती
कीर्ति तयाची गर्जत आहे नाद पोंचला दूरवरी
वारद गुण वर्णन हें गाइन सख्या सजना हृदयीं धरी ।। १ ।।
गेली घडि येइना पुनरपी, अहा रम्य तें बाळपण
बाळपणीं या हट्टी होता वारद ह्मणती ✓ जन

मुलांकडे पाहोनि नळमळे वडिलाची वेडी माया
सत्कीर्ती धावले दशदिशा इत्यादी दांडगी त्या
धवल कीर्तिला गालबोट हें लांछन चंद्रावरिल जसें
भाविकाळ ना कळे कुणाला ह्मणुनि जगामधिं मौज असे
कवडिमोल परि कसा खेळवी हा पइसांचा मोह पहा
सर्व सुशिक्षित वर्ग भासतो फिरता पुस्तकसंग्रह हा
आंग्ल-शिक्षणीं लक्ष लावुनी सेवावृत्ती वरुनि बरी
सोनेरी पिंजऱ्यातिल पोपट झाला असता कुठें तरी
खैर केलि देवानें ह्मणुनिच मगरमिठींतुनि मान निघे
गुरुपरीचें परंपरेचें व्यवहाराचें शिक्षण घे
संस्थेच्या धंद्यासह खेळति आज कालचे विद्यार्थी
अशा धंद्यामधिं वारद मिळवी व्यवहारामधिं शुभ कीर्ती
त्यानीच्या अमदानित येता होत यशस्वी व्यापारी
वारद-गुण-वर्णन हें गाइन संग्या सज्जना हृदयीं धरी ॥ २ ॥
व्यापाराची उडी दांडगी पुरी पडेना ही दुनिया
व्यापाऱ्यांनीं अह्मा जिंकिलें यामधिं सार समजुनि घ्या
समरातिल मर्दुमकी गेली बुद्धिबळाचा काळ आला
तलवारीचें तेज पडेना मान तागडी तराजुला
तकदीरासह टक्कर देवुनि पहिलवान हा पटाइत
सुविचारें व्यापारें साधित सत्कीर्तीसह देशहित
व्यापारीं संसार वाढवी शह... दूरवरी
गुणपरीक्षा करोनि नराची का... तयावरी

कापड-गिरणी येथें काढुनि दुवा घेतला जनतेचा
देशोन्नतिचा पाठीराखा भोक्ता उद्यम वृद्धीचा
हिंमतीचे व्यापारी ऐसे क्वचित् लाभती कुठे तरी
वारद-गुण-वर्णन हें गाइन सख्या सज्जना हृदयिं धरी ॥ ३ ॥
उत्तम खेती जरी बोलती मान तियेला नसे मुळीं
हिंमत खचली नोकरि रुचली अकाशाई काशि सुचली
स्वतंत्रतेचे भक्त बहाद्दर बघता भासति घरोघर
वक्तृत्वावर पिकेल का हो ज्वारि बाजरी पसाभर
मेहनतीविण धान्याचा कण कधिं उगवेना शेतात
मेहनतीविण चळवळ सारी वाळूवरली इमारत
वडिलोपार्जित जमीन नव्हती ह्मणुनि खरिदी घेत त्वरें
प्रेमानें प्रतिपाळी बहुपरि गाइ गुरांचीं खिल्लारें
परोपरीची करी मशागत सदुद्यमाचा हा भोक्ता
कष्टाचें फळ हटकुन देते कामधेनु ही भूमाता
कधिं नव्हता तो कापुस पिकला सोलापुरच्या जमीनिला
प्रयत्न ह्मणुनी प्रयोग करवी नवी आणवुनि यंत्रकला
यशाहानीला मिवुनि स्वकार्यी कधीं न केली कुचराई
कुणी कसेंही ह्मणो मज गमे खास स्वदेशी चळवळ ही
साध्याभोळ्या शेतकऱ्यांचा नव्या दमाचा कैवारी
वारद-गुण-वर्णन हें गाइन सख्या सज्जना हृदयिं धरी ॥ ४ ॥
दीन दुर्बळा अंध पंगुला अन्नवस्त्र देई अहर्निशीं
माय बाप भासला तयाला खडतर संकट समयासी

ज्ञानदान द्यावया जनाला संस्कृत शाला स्थापितसे
विद्यार्थ्यांवरि देखरेख करि पूर्वाश्रमिंचे ऋषी जसे
पवित्र क्षेत्रीं बहु विद्यार्थी विद्याभ्यासा पाठवित
धर्मजाग्रती कार धर्मात्मा नाना यत्न सदोदित
सत्सुखदायक असे जाणुनी धर्मज्ञान या क्षत्रिवरी
ग्रंथ प्रकाशानें लक्ष मुद्रिका उदारधी हा खर्च करी
म्हून चुकुयाची ... काळिची पवित्र इच्छा पुरवील
लक्ष-एक शे ... आहे ... आत उल्हास धर्मार्थ
बारद मजला मान देइना असा कसा हा सज्जन रे
देशादेशा अति आक्रोशे ह्मणुनि कृपणता रडत फिरे
गुणी जनाच स्वागत करुनी समता सर्वांठाई धरी
... गुण वर्णन हें गाइन सख्या सज्जना हृदयीं धरी ॥ ५ ॥
व्यापारी मैदान मोकळें महाराष्ट्राला मुळिं नव्हतें
मुंबापुरिचे बनिये भाटी प्रमाण जें जें करितिल ते
पडावर बेधडक आज ते सवाल सौदा करितात सही
ही याशाणिची काढी नोहे बारदकृतिची पुण्याई
छप्पन परिची वजनें मापें बघुनि भ्रम पडे सूज्ञ जना
शिकस्त करुनी शि... लाविता ये व्यवहारा सुलभपणा
उद्यमप्रीती उगी ब... आळस ठावा नसे तिला
अति आनंदें उत्तेजन ... उद्योगप्रिय मनुजाला
... इंद्रभुवन ... ह ...
रसिकपणामाधे असे रम्यत... दार वैभव तयानिक

अधिकाऱ्यांच्या लहरीखातर सत्य सोडिना कधिं सहसा
लाखामधिं एखादा असतो धनिक ब्राणेदार असा
अष्टपैलु हा हिरा शोभला मोल तयाचें कोण करी
वारद-गुण-वर्णन हें गाइन सख्या सजना हृदयिं धरी ॥ ६ ॥
असामान्य कुणि सुजनमान्य बहु ' राजमान्य ' गणतीन्त नसे
सर्वमान्य सत्‌शील सद्‌गुणी धन्य जगीं हा शोभतसे
धनयौवनसंपन्न जनांमधिं मान मरातब बहु होता
अहंकार दुर्व्यसन दिसेना असे एवढी कमतरता
सर्व यशाचें सार तयाच्या शिवभक्तीमधिं पूर्ण असे
सदाशिवावर धरुनि भरवसा निर्भय मानसिं वर्ततसे
काळ चोर बेदर्द भयंकर फिरस्त्या घाली दिन रजनी
संधी साधुनि नेत हिरावुनि वारद तनुही जगातुनी
नश्वर तनु नेवुनी तयाचा लाभ जाहला काय तुला
अजरामर सत्‌कीर्ति जाइना काळाचा जरि काळ अला
यशवृक्ष विस्तरो प्रभो हा बहु फल फलभारें अवनिवरी
वारद-गुण-वर्णन हें गाइन सख्या सजना हृदयिं धरी ॥ ७ ॥
वारद-गुण-वर्णन हें वाटे कित्ता सुंदर विवलकरी
वळणदार परि वळण गिरविणें ज्यांच्या त्यांच्या मनावरी
श्रीमतांनीं साधन ह्मणुनी कांहीं दिन हा गिरवावा
सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मीचा मौक्तिक ठेवा
स्वजातीचा निजधर्माचा असेल जो कट्टा अभिमानी
मळ्यांतील ताइतापरी हें चरित्र मा.. त्यानीं

जुनेच सोनें वाटतसे ज्या पुराणमतवादी लोकां
विचारितो मी बारदचरितीं दोष तुम्हां कधिं दिसला कां
जव नवें तें सर्व हवेसे तुला वाटते नव्या युगा
बारदहृदयीं तुला योग्य अशि मिळली होती ना जागा
साधी-राहणी-युक्त-चित्र हें धरुनी नयना सामोरी
चैनीच्या चिखलांतील प्राण्यां अंकल घें रे काहितरी
स्वतः करांना दुसरा दूषण देउ फिरे जो पिशापरी
त्या वेडावर अचूक अंजन होइल वाटे गुणकारी
दीन याचका करित याचना का फिरसी रे असा सदा
सर्व धनिक बारदापरी हे समजु नको मनिं मतिमंदा
भगवताची दौलत नोहे देवाघरची ठेव असे
दीनासाठीं दीनदयाघन विश्वासानें ठेवितसे
साल सवाई करुनी पूजिल जनतारूपी जनार्दन
शीलवंत सत्कीर्तिवंत जगिं धन्य धन्य तो धनवान
शेवटचा संदेश तयाचा सख्या सजना हृदयिं धरी
कुंजविहारी बारदवर्णन तव पदिं अर्पण करित हरी ॥ ८ ॥



## १० सिद्धेश्वर चरित्र ( सोलापूरवर्णन )

( चालः—बिकट वाट )

गणाधीश तूं ईश गुणाचा कवनारंभीं तुला नमू
सरस्वती गुणमयी गायनीं स्फूर्ति द्यावया तुला नमू
सोलापुरच्या ग्रामदेवते श्रीसिद्धेश्वर तुला नमू
हर हर हर महादेव गर्जुनी रेवणसिद्धा तुला नमू
स्वरूप दिधलें जगा जियेनें चित्‌शक्ती ती मनीं नमू
तुळजापुरची वाट दाविशी रुपाभवानी तुला नमू
काळ जाळुनी जियत अजुनी ब्रह्मचर्य तेजासि नमू
त्याच काळजापूरनिवासी हनुमताला सदा नमू
कलिमलहरणा मल्लिकार्जुना मध्यवास्तवर तुला नमू
गरीबीच आवडली का गे महालक्ष्मी तुला नमू
जुने पुराणे नवनवसाचे रामविठोबा तुला नमू
मंगलकार्यी साह्य होशि तू घाटावर गणपती नमू
गुरु भेटीची भेट घेउनी मार्कंडेया मुने नमू
त्या बाळ्याच्या ओढ्यावरुनी खंडेराया तुला नमू
सिद्धेशाच्या सन्निध तुजला हजरत शहाजावली नमू
उरले सुरले देव सर्वही एकदांच साष्टांग नमू
निसर्गरूपा आत्मस्वरूपा कुंजविहारी गिरिधारी
( श्रीसिद्धेश्वर चरित्र गातो बुद्धि मज साह्य करी )
सोलापुरवर्णन हें गाइन सद्भावें [illegible] साह्य करी ॥ १ ॥

अवचित कधिंतरि दृष्टिस पडतां भयाण भेसुर तो किल्ला
भूतकाळचीं भुतें करिति जणु वाटे हृदयावर हल्ला
मात्र भूमिचें वैभव दर्शक चित्र समजुनी तें एक
नमस्कार हा करितो सारा आवरूनि मनिंचा शोक
माझागे सद्भावें नमितो दयासिंधु शुभरायाला।'
रमा वल्लभा ' तवपद पंकाजिं दे आश्रय या दासाला
आनंद मी नमितों आतां कविता देवीचा कलिजा
राम जोशि तात्या ' हा येतो स्वीकारा मुजरा माझा
तमाशातही नाचवुनी तशि कीर्तनरंगीं रंगविली
कविरायानीं कविता असली यानंतर नाहीं झाली
वीरशैव कुलदीप जयाचा प्रकाश शोभे रम्य अती
तो मल्लप्पा वारद ' नमिला जगात गाजे यत्कीर्ती
इतिहासज्ञा टिकेकराला ' नमन कराया विसरूं कसा
कलम अहा रे धनुर्धारिचा शिपाइ बाण्याचाच ठसा
' सामतादि [illegible] राष्ट्रसंत आणि उदार गुणनिधि जन सुमनी
जनता जगदीशे मी नमिली नाव कुणाचें घेउ किती
या नमनातुनि उरलेल्यानो राग मनामधिं नका धरूं
घ्या पदरीं तुम्ही मायबापहो मी परदेशी लेकरूं

उंबरगीकर [illegible] ' कवि त्या मस्तक वाहुनि पदावरी
( श्रीसिद्धेश्वर [illegible] गातो सद्भावें मज साह्य करी )
सोलापुर वर्णन हें [illegible] सद्भावें मज साह्य करी ॥२॥

(येथें सिद्धेश्वर चरित्राची प्रस्तावना संपली. हें प्रकरण बरेंच मोठें असल्यामुळें स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. हें चरित्र पुरें करण्यापूर्वी 'सोलापूर वर्णन' म्हणून वरील कवितेंत ज्या स्थानिक महत्वाच्या प्रसंगाचा उल्लेख करण्यांत येत असे त्यांपैकीं कांहीं प्रसंग.)

## गिरणींतील पहिला संप

भीत भीत परि तुजला नमितो होमावरल्या पटांगणा
सूश जनाचा जिथें समजला संपामधला शहाणपणा

भला बहाद्दर 'भीमराव' तो असो अशिक्षित वद्र मला
शिव-शाहीतिल शिकेकटारी बहाल करा रे कुणि त्याला
उभें शहर जणु नाचत होतें भीमराव बोलेल तसें
तीन विसा दिवसावर ऐसें कार्य चाललें बहु खासें
असे कुणाची छाति कराया कर्तबगारी ही जी सखी
बहाद्दरी नच कमी तयाची दैवें-जरि मसलत फसली
हॅच रोडवर ग्रांच रोडवर गोळीबारा पडली भली
निरापराधी रक्त सांडलें कहर मांडिला अ[illegible]ळी
अजुनी टप-टप थेंब टपकती मजूर बनुनी [illegible]ा एका
सिमकाकाची कारकीर्द ही यमदूताचा [illegible] काका
भोळ्या जीवा विसरू कसा रे शेवटचा [illegible]या मुजरा
गिरणीमधला मजूर आम्ही भाउबंद [illegible] वाच खरा

# सोलापुरची प्रांतिक परिषद

नकाशात व्यापरी भारतीं [illegible] भूमिचा आकार
तदाकार शोभतें लक्ष्मीमधि सिद्धेशाचें मंदिर
सिद्धेशाचें दर्शन घेउनि बाहिर येतां उजविकडे
सोलापुरची सुंदर शोभा इंद्रभुवन ये दृष्टिपुढें
जिथें विसावी प्रांतिक परिषद असे जाहली यशशाली
विपरित क्रांतिच्या नरवीराची टोळधाड होती आली
ते शिकलेले शहाणे सुतें मारामारी करिति कशी
अभिमानास्तव केव्हां केव्हां सुशहि पडती तोंडघशी
नमस्कार साष्टांग करुनियां भाळीं तेथिल धूळ धरूं
लोकमान्य टिळक हा शेवटीं जिथें पाहिला राष्ट्रगुरू

## पोवाडा संपविण्यापूर्वी

आयकिल्या पाहिल्या तयांतुनि ज्या ज्या गोष्टी आवडल्या
कौतुक म्हणुनी रसिकांनीं लिहिल्या विचारल्याविण सांगितल्या

❀ ❀ ❀

निसर्गरूपा व चित्ररूपा कुंजविहारी गिरिधारी
सोलापुर वर्णन [illegible] सद्भावें मज साह्य करी ॥३॥

## ११ श्रीज्ञानेश्वर

( भूपाळी )

सत सज्जना विश्वभूषणा वदन करि मन्मना
चरित्र-श्रवणें पवित्र सखया होइल तव भावना ॥ धृ ॥
गावावरुनी यात्रा जाते तळमळतें मन्मन
पराधीन जीवनामधुन मी मुक्त कधीं होइन
'पुंडलीक-वरदे-हरि-विठ्ठल' नाम गजर होतसे
दिंडि नमे ही फौज चालुनी काळावर जातसे
काळासंगें झुंज झुंजती चपळाई अद्भुत
नित्य वागविति क्षमा शांतिची ढाल आणि चिलखत
विजय दुंदुभी समान शोभे टाळ–मृदंग–ध्वनी
वीर वारकरि विजय मिळविती तलवारी वाचुनी
भगवा झेंडा हलतो डुलतो खांद्यावर खेळतो
'ज्ञानोबा माउली तुकाराम' निनाद नभिं नादतो
आळंदीची वाट चल मना विनवू तुज [illegible] त्वर
योगिराज सद्भक्त मुगुटमणि भेटावि ज्ञ[illegible]
करचरणांनो मम नयनांनो धीर धरा [illegible]
मनातला सद्भाव कधीं तरि पुरविल [illegible] श्रीहरी
गा गा रसने आनंदानें येतिल तैसा [illegible]रि
ज्ञानेशाच्या धन्य यशाची दोन चार अक्षरें
परमार्थाचीं पुष्पें फुललीं विरक्त-[illegible]वर
विठ्ठल रुक्मिणि उदरीं जन्मले [illegible]दुरु ज्ञानेश्वर

सन्मार्गाला सुजन लाविले बोध करुनि बहुपरी
वैकुंठीचा हरि आणिला पंढरिं भिवरा-तिरीं
प्रेमभक्तिमय पथ तयाचा अभेद हा परबल
विश्व विष्णुमय मी न निराळा जीवन तुलसीदल
गीतेचा भावार्थ सुलभ हा सांगत ज्ञानेश्वरी
कोटिकुळें उद्धरति भक्तिनें ' हरिमुखि ' म्हटल्यावरी
सगुणसुंदरा सदय उदारा रखुमादेवी-वरा
वनवासी जीवास भेटवी ज्ञानेश्वर सोयरा
अकरावा अवतार हरीचा ज्ञानेश्वर सद्गुरू
आळंदीला जाउनि प्रेमें नमन तयाला करू
कुंजविहारी विनवी मजवरि करि करुणा मन्मना
चरित्र श्रवणें पवित्र सखया होइल तव भावना ॥१॥

## १२ भेटेन नऊ महिन्यांनीं

( राष्ट्रकार्यार्थ फांशी जाणारा निरपराधी प्राणी आपल्या मातेचें सांत्वन करीत आहे. चौरीचुरा प्रकरणांतील आरोपीच्या मुखांतून वरीलप्रमाणें उद्गार निघाल्याचें प्रसिद्ध झालें होतें. )

( चालः—अजि अक्रूर हा )

मनिं धीर धरीं शोक आवरीं जननी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ध्रु ॥
या न्यायाची रीत मानवी असते
खरि ठरते केव्हां चुकते
किति दुर्दैवी प्राणी असतिल असले
जे अपराधाविण मेले
लाडका बाळ एकुलता
फाशीची शिक्षा होता
कवटाळुनि त्याला माता
अति आक्रोशें रडते केविलवाणी ॥ भेटे०
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ १ ॥
किति वेळ असा शोक करिसि गे वेला
दे निरोप मज जायाला
होईल पहा विफल तुझा आक्रोश व
बाहेर उभे यमदूत

ते चाकर सरकाराचे
नच उलटे काळिज त्यांचें
परि शरमिंदे अन्नाचे
तुजपासुनिया नेतिल मज ओढोनी
भेटेन नऊ महिन्यानीं ॥ २ ॥
तुज सोडुनि मी जाइन का गे इथुन
परि देह परस्वाधीन
बघ बोलति हे बोल मुक्या-भावाचे
मम दोरखड दडाचे
अन्नपाणि सेवुनि जिथलें
हें शरीर म्यां पोशियलें
परदास्य देश तो लोळे
स्वातंत्र्य मला मिळेल मग कोठोनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ३ ॥
का परकाला बोल उगीच लावावा
दैवानें धरिला दावा
लाभेल. भोग कुणाला जगतीं
या जळल्या घरिं विश्रांती
उनी उशाला साप
येईल कुणाला झोंप
हा सर्व ईश्वरी कोप
ही परवशता भयंकर करणी
नऊ महिन्यांनीं ॥ ४ ॥

मज फांशीची शिक्षा दिधली जाण
न्यायाचा करुनी खून
या मरणाची मौज कशी बघ असते
सांगेन तुला मी माते
मी राजपुत्र दिलदार
घेउनी करीं समशेर
भोंवती शिपाई चार
करितील अता स्वागत जन मैदानीं
भेटेन नऊ महिन्यानीं ॥ ५ ॥
मजसाठिं तिथें सिंहासन निर्मियलें
त्या एका खांबावरलें
मी वीर गडी चढेन गे त्यावरती
इतराची नाहीं छाती
इच्छिली वस्तु द्यायाला ती
अधिकारी तैनाती [illegible]
प्राणापरि जपतील मला
या दुनियेची दौलत लोळे चरणीं
भेटेन नऊ महिन्[illegible]नीं ॥ ६ ॥
या सर्वांचें मजवर भारी प्रेम
देतील [illegible] ता[illegible]म
हें वैभव मी विकत घेतलें [illegible]
देउनी [illegible] जीवाचें

या गळ्यातला गळफास
देईल घडीभर त्रास
लाभेल मुक्ति जीवास
वर जाइन मी लाथ जगा हाणोनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ ७ ॥
या देहाची करूं कशाला चिंता
होईल तें होवो आता
कुणि करुणेचे सागर हळहळतील
कुणि हसणारे हसतील
अश्रूंनीं न्हाऊं घाला
प्रेमाचें वहाण त्याला
मातीचा मोहक पुतळा
जाईल पहा क्षणांत मातींत मिळुनी
भेटेन नऊ महिन्यानीं ॥ ८ ॥
सांगत रहा तुला शपथ घेउनी आई
[illegible] मरणाला भ्यालो नाहीं
आ[illegible] [illegible]पनीं श्रीगीतेचें सार
[illegible] कीं नश्वर तनु जाणार
[illegible] हृदयाचे मोजुन ठोके
[illegible] बघ शांत कसें आहे तें
वाईट वाटते इतुकें
तव सेवेला [illegible] मी जननी
[illegible]टेन नऊ महिन्यानीं ॥ ९ ॥

माउली तुझा नव्हे नव्हे मी कुमर
पूर्वीचा दावेदार
तव सौख्याच्या वाटेवर निर्मियले
दुःखाचे डोंगर ससले
नउ मास भार वाहून
बाळपणीं बहुपरि जपुन
संसार दिला थाटून
परि बनलों मी खचित अभागी प्राणी
भेटेन नको महिन्यानीं ॥ १० ॥

" मम बाळ गुणी वृद्धपणी बहु साल
आह्मांला सांभाळील "
तव ममतेचे बोल ऐकले असले
परि सारें उलटें झाले
माउली विनंती तुजला
सांभाळ तिला बाळ
नच बघवे तिच जला
हा कठिण गमे प्रसंग मरणाहूनी
भेटेन नको महिन्यानीं ॥ ११ ॥

लाभतें जया वीर-मरण भाग्याचें
वैकुंठपदीं जो ना
दे जन्म मला मातृभूमिचे
पुनःपुन
मरण्यासाठीं

मागेन हेंच श्रीहरिला
मातृभूमि उद्धरण्याला
स्वातन्त्र्यरणीं लढण्याला
तव शुभ उदरीं जन्म पुन्हां घेवोनी
भेटेन नऊ महिन्यांनीं ॥ १२ ॥
मग यम-दूतें ओढुनि त्याला नेलें
व्हायाचें होउनि गेलें !
परि त्या ठायीं शब्द उमटती अजुनी
'भेटेन नऊ महिन्यांनीं'
खांबाला फुटतिल फाटे
मृदुसुमसम होतिल कांटे
हिमगिरिला सागर भेटे
परि परवशता सुखकर झाली नाहीं
हे कुंजविहारी ग्वाही ॥ १३ ॥

## १३ रत्नागिरी परिषद

( सोलापूर परिषदेपासून विशिष्ट राष्ट्रीय कविता लिहि-
ण्याची जडलेली खोड या कवितेनंतर नाहींशी झाले )

### ( धन्य शिवाजी )

लक्ष लावुनी ऐक भारता विचार कर पुरता
महाराष्ट्रातील राष्ट्रियसज्जन सम्मेलन वाला । ध्रु ॥
सन्मित्रांच्या संगतिनें बहु सुख झालें जीवा
जन्मा येउनि मुंबापुरि मी पाहियली परवा
मुंबानगरी आर्यदेविचें महाद्वार भासे
कोंकण चरणीं घेत म्हणुनि हा सागर उल्हासे
तव छातीवर नाच नाचते परदेशी बोट
म्हणुनिच कां रे सागरराया करिशी बोभाट
पराधीन मी तुलाहि वाटे परक्याचा धाक
समदुःखी आम्हि परस्पराला सांगू सुखदुःख
परमेशाला सांग जाउनी मावळत्या सूर्या
आर्य जनापरि स्वतंत्र व्हाया धडपडतो पुत्रा
पाणबुडीवर निजवुनि आम्हां हालविते ऐसे
परवशतेंची नटवी माया अंगाई गाते
समुद्रालही शांत होइना अंगाची भारी
पाण्यांतुनि दुष्मान् कुणीतरि करितो गडलाग
हृदय तळमळे मस्तक भ्रमलें वाटे बहु भीती

पंचूनाणीनी नाच नाचमू आज्ञिला ।पता।

पाण्याचें थैमान नसुनि जणु भासति यमदूत
पत्नीच्या सौभाग्यें जळली जीवाची ज्योत
अनुभवलेले हाल विसरलों रत्नागिरि वंधता
महाराष्ट्रातिल राष्ट्रिय-सज्जन-संमेलन-वार्ता ॥ १ ॥

❀ ❀ ❀ ❀

टिळकनाम संयोगें आली शहरा सुंदरता
लतापल्लवें मंडित मंडप निर्मियला होता
'डॉक्टर बाबा पराजपे' मज मुखासनिं दिसले
जुने पुराणे कुणी तपस्वी वाटे अवतरले
नरकेसरि 'नरसिंह' कुणीही कसेंहि घ्या नाव
महाराष्ट्राच्या अभिमानाची आवडती ठेव
भाषण-शैली 'दा. वि. गोखले' स्वाभिमान-पूर्ण
'भोपटकर अण्णाचा' हंसवी अनुनासिक वर्ण
'स ताम्हणे दादा' वरतुनि ह्मणात शांतगाठ
घाव जिव्हारीं वसे शत्रुला परि विनबोभाट
कार्ये देखिचा ताम्हा 'डॉक्टर सावरकर नाना'
मजु मनोहर गमे चातरी भाषण करितांना
'श्रीकृष्णाजी खाडिलकर' तो नवाकाळवाला
'स्वराज्यकर्ते पराजपेही' तिथें नाहिं दिसला
आर्य भूमिचे सेवक सज्जन नव्हेत हे का ग
या दोषाला कसेंतु विसरलिस सांग लोकांगे

राष्ट्रिय पर्वणि साधाया जन गजबजला होता
महाराष्ट्रांतिल राष्ट्रिय-सज्जन-संमेलन-वार्ता ॥ २ ॥

❀ ❀ ❀ ❀

डॉक्टर बाबा पराञ्ज्याची अधिकारी वाणी
महाराष्ट्राचे मूक मनोरथ सांगत गर्जोनी
'राष्ट्र माउली भारतभूमी अम्ही तिचे कुमर
मर्दुमकीचा महाराष्ट्र हा जगांत मशहूर
गनिमी कावा वेष बावळा देश डोंगराळ
स्वतन्त्रतेचें साधन शिकवी श्रीशिवभूपाल
श्रीतिलकाची अभ्यास ठावी शठे शाठ्यनीती
अम्हां रुचेना अम्हां पचेना गांधीची शांती
अम्हा न सहवें अवजड ओझें असहकारितेचें
लाभावांचुनि आत्मक्लेश कां सहन करायाचे
राजकाज हे घडिघडि पलपल बदलणार ...
गांधीजीसम सत्पुरुषाचा होत मानभंग
प्रतियोगी सहकार योग हा धरुनी हृदयाव
ही गुरुघंटा नोकरशाही करूं पादाक्रांत
नोकरशाहिस हतबल बनवा सांपडेल तेथें
कौंसिलांतही घुसा जिथें ती निर्दिदिनीं ... वरते
आर्यभूमि ही सुखवा शौर्ये साधुनि देशहिता'
महाराष्ट्रांतिल राष्ट्रिय-सज्जन-संमेलन-वार्ता ॥ ३ ॥

❀ ❀ ❀ ❀

रत्नागिरिची बघुन मनोहर निसर्ग शोभा ती
टिळक-वर्णनी 'केळकरांची' रंगे रसवती
'धन्य धन्य ही पवित्रतम अति तिलकजन्मभूमी
गुणरत्नाची खाण शोभली रत्नागिरि नामी
दास्य सागरीं बुडुनी बनता भारत परदेशी
दर्याकांठी दीप उजळला तिलक मार्गदर्शी
गिरिशिखराचे उच्च मनोरे नयनां मोहविती
तिलक महत्वाकांक्षा त्याहुनि मुळिं कमती नव्हती
बळजबरीला कधीं न लवली खडकाची मान
टिळकांनीही असे साहिले असह्य अपमान
नानाविध नवरूपें नटली गुणमयि वनदेवी
तिलक गुणाची टिळकावाचुनि गणति कुणा व्हावी
फणस नारळीसमान वरतुनि कठोर तो भासे
अंतःकरणीं मृदुल मनोहर कोमलता विलसे
करित प्रभातीं रहाट गायन नवजीवनदायी
जुनी पुराणी मडकी त्यामधि फुटकीहि कांहीं
त्यासम योजित तिलक युक्तिनें राष्ट्रकार्यी सकला
नव्या जुन्याला भल्या बुऱ्याला गरीब दुबळ्याला
तिलक कथा गंगाजल निर्मल स्नाने सार्थकता'
महाराष्ट्रांतिल राष्ट्रीय-सज्जन-संमेलन-वार्ता ॥ ४ ॥

❀ ❀ ❀ ❀

टिळक सुधारस केळकरांची वाढितसे वाणी
तृप्त होइना मानस सुटले तोंडाला पाणी


वाङ्मयभूषण कवि मनमोहन सुमनाचा झेला
या कांटेरी राजकारणी कैसा सापडला
पहा उघडुनी इतिहासाची कुठुनीही पानें
महाराष्ट्राच्या दैवीं दिसतें द्वेषाचें दुखणें
खूप होतसे कौंसिलसाठीं शक्तीचा व्हास
कलावंतिणी नोकरशाही तुझीच शाबास
वादाच्या वेदांतीं शोधिति स्वराज्य ब्रह्मासी
कुणि शिकवावा शहाणपणा मग अशा सज्जनांसी
बड्या बड्यांच्या भांडणांत मज गाळु नको देवा
घडो ऐपतीपरी कांहितरि राष्ट्राची सेवा
कुंजविहारी ह्मणे पुरवि ही आस जगन्नाथा
महाराष्ट्रांतिल राष्ट्रिय-सज्जन समेलन-वार्ता ॥ ५ ॥



# १४ शिवराई

( शार्दूल-विक्रीडित )

जीवा जागउनी जिनें निजबळें
दास्यत्व-स्वप्नातुनी
महाराष्ट्रा अमरत्व देउं सजली
स्वातंत्र्य संजीवनी
'शिवराई' आजि ती कुठें हरपता
होती किती यातना
नाहीं मान जनीं न नींज नयनीं
जाणिव जाळी मना ॥ १ ॥



## १५ श्री शिवछत्रपति.

( धन्य धन्य भूपाल शिवाजी )

महाराष्ट्र-नरसिंह शिवाजी सिंहासनिं शोभला
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ धृ ॥
परवशतेची नवी आठवण जुन्यापरी भासते
कांहिसें कौतुकही वाटतें
गुलामगिरिची सुरी विषारी जखम जिव्हारीं करी
भासतें सारें स्वप्नापरी
काळ एक ऐसा होता
या महाराष्ट्र देशाचा
बेमुरवत परकीयांनीं
अभिमान तुडविला अमुचा
वागुनी जशाला तैसे
घेतला सूड सकलांचा
उपहासें हासतो विनोदें अजि त्या काळाला
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ १ ॥
मृत राष्ट्राला जगीं जागउनि चिरंजीव करिते
असो तव स्वागत परवस्ते
नम्या दमाच्या तरुण गड्यावर प्रेम तुझें भारी
करविशी बहु कर्तबगारी

संचरे नवें चैतन्य
        जन उदार प्राणावरती
आवती तरुण समरात
        घेउनी शीर तळहातीं
मृत्यूच्या खेळगड्याला
        जगिं नुरे कुणाची भीती
शुभागमन स्वातंत्र्य-देविचें सुचवि दास्यशृंखला
        सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ २ ॥
असह्य हो अपमान पदोपदीं वावरली जनता
        नाचते भीषण परवशता
विटंबना बहु कुलयुवतींची गाइ-ब्राह्मणांचे
        हाल ते नच बदवति वाचें
होउनी चोर शिरजोर
        घरधन्यासि तस्कर ह्मणती
मावळे सरळ-वृत्तीचे
        समशेर घेउनी हातीं
सगरीं खऱ्या-खोट्याचा
        पडताळा पाहू ह्मणति
देवाघरचा न्याय लाभला श्रीशिवरायाला
        सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ ३ ॥
खुल्या दिलाच्या वीरवृत्तिच्या तरुणाची टोळी
        शिवाजी जमवित भंवताली

दडी धरुनि बेधडक शत्रुवर चालुनिया जाती
        मुखानें हर हर गाजविती
रणधीर मावळे वीर
        मांडती रणीं रणयज्ञ
त्या पवित्र धारातीर्थी
        घालुनी शत्रुला स्नान
आहुती तयाची द्याया
        निज प्राण करिति कुरवान
शत्रु मित्र सेविती रणागणिं चिरविश्रांतीला
        सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ ४ ॥
स्वदेश-द्रोही स्वजन नराधम कार्य नाश करिती
        तयाची करुनी शिरगणती
काटे सारुनि दूर बनविला राजमार्ग बरवा
        उशाला साप कुणी घ्यावा
शिवराय धोरणी मोठा
        जो संकटा न डगमगला
लढउनी गनीमी कावा
        बहु हतबल बनवी रिपुला
लाभलें सुयश समरात
        त्या भवानि समशेरीला
महिषासुर-मर्दिनी भवानी प्रसन्न दासाला
        सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ ५ ॥

स्वातंत्र्याचा सूर्य उगवला रायगडावरती
शिवाजी झाला छत्रपती
सुभाग्य फळलें शत्रु निमाले संकट-नग टळले
प्रजा मनिं आनंदें डोले
हो विजयी भगवा-झेंडा
गर्जना करिति रणभेरी
मानाचा मुजरा झडतो
नउ लाख खड्या समशेरी
शिववैभव सुंदर त्याली
दख्खनची दौलत सारी
महाराष्ट्र-मेदिनी आरती ओंवाळित त्याला
सुदिन हा सोन्याचा उगवला ॥ ६ ॥
शिवरायाचें स्मरण मराठ्या अंतरिं धरि कांहीं
कृतीविण दास्य टळत नाहीं
मर्द गड्या चल मार अघाडी, मानधना सुजना
कीर्तिचा तुलाच नजराणा
करि विनती कुंजविहारी, बा! महाराष्ट्र-नरसिंहा
जाग रे जाग लवलाही, जीवींच्या जिवलग जीवा
नव उज्ज्वल स्वातंत्र्याची, करिशील गर्जना केव्हा
त्या दिवसाचे नवे पवाडे आनंदें गाया
शक्ति दे मला देवराया ॥ ७ ॥

———:※:———

## १६ दावि रूप डोळा पांडुरंगा !

( संताच्या प्रदेशांत परवानगीवाचून प्रवेश केला असला तरी जपून पाऊल टाकण्याची खबरदारी घेतली आहे. )

॥ अभंग ॥

येउं दे दयाळा, दीनाचा कळवळा.
दावि रूप डोळा, पांडुरंगा ! ॥ धृ ॥
आयुष्याचें कोडें, सोडवील कोण,
सांग तुझ्यावीण पांडुरंगा.
कोण मी कोठील, जन्मलों कासया.
जाणें कोण्या ठाया, पांडुरंगा.
' होते ' ते निमाले, ' आहेत ' ते जाती
' जाणार ' मी अर्ती, पांडुरंगा.
जगाचें जीवन, मृत्यूच्या आधीन,
सत्य हें भीषण, पांडुरंगा.
गीता-गुरुनाथ, मृत्युभयें भ्याला,
दावि रूप डोळा, पांडुरंगा ॥ १ ॥
मृत्यूच्या मंदीरीं, लगीनसराई,
आशा वरमाई, मीरवते.
देखणा हा देह, जांवाई मानीला,
जीव जोजावला, तुझ्यापायीं.

अश्रूंच्या अक्षता, रुदनाचे मन्त्र,
चाले अहोरात्र, सोहळा हा.
सुखाचें स्वरूप, ऐसें हें भेसूर,
नकोसा संसार, का ? न व्हावा.
गीता-गुरुनाथ, जीवा वैतागला,
दावि रूप डोळा, पांडुरंगा ॥ २ ॥
मृत्यूचें मरण, आहे ज्याच्या हातीं
ऐसा तो सांगाती, सांपडेना,
दुजा तुजवीण, संरक्षील कोणी.
देईन धरणी, दान तया.
माझ्या ' मी ' पणाचा, मज भारी लळा,
आवडे जीवाला, जीवाहूनी.
माझें ' आहेपण ' हारपल्यावरी
तया कोणा करीं, देऊं बरें !
गीता-गुरुनाथ, वेडापिसा झाला,
दावि रूप डोळा. पांडुरंगा. ॥ ३ ॥
उदासीन मन, फिरे सैरावैरा,
चुकल्या वाटसरा, परी रानीं.
आहे जो समर्थ, हेतू पुरवाया,
सांगेन मी तया, दैन्य माझें.
जीवीच्या जीवना, सख्यासमाधाना,
येऊं दे करुणा तुजलाही.

संताच्या संवगड्या, आनंदाच्या कंदा,
निवारी आपदा, दयासिंधो
गीता-गुरुनाथ, विनवी वेळोवेळा,
दावीं रूप डोळा, पांडुरंगा ॥ ४ ॥
डोळ्याचा देव्हारा, केला तुजसाठीं.
येईं जगजेठी, मायबापा.
नयनीं सांठवीन, अश्रूनें न्हाणीन,
मनाचें सुमन, सुगंधीत.
वाणीचा नैवेद्य, प्राणाची आरती,
हृदयीं विश्रांती, घेईं सुखें.
अंतरींचे गूज, एकांतीं सांगेन,
काया कुरवंडीन, चरणावरी.
गीता-गुरुनाथ प्रेमें वेडावला,
पहावया डोळा, पांडुरंग ॥ ५ ॥

REFBK-0002577

# १७ तानाजी मालुसरे

( धन्य धन्य भूपाल )

शिवरायाचा सिंह सिंहगडिं पडला समरांगणीं
मराठा गडी यशाचा धनी ॥ धृ ॥
महाराष्ट्राच्या पुण्याईच्या फुलल्या फुलवेली
सुगंधें सृष्टी दरवळली
सह्याद्रीवर दरी दरींतुनि फिरुनी प्रेमानें
वेंचिलीं फुले फुलाऱ्याने
फुलवरा वाहिला तेव्हा
बोलली भवानी आई
अपवित्र रक्त शत्रूचें
मम तहान शमली नाहीं
येउ दे नव्या नवसाचा
नैवेद्य अता लवलाही
तानाजी करि शांत अंबिका स्वदेह पार्दि अर्पुनी
मराठा गडी यशाचा धनी ॥ १ ॥
जिजा माउली ह्मणे शिवाजी कोंडाण्यावरते
कुणाचें निशाण फडफडते
यश अस्मानीं दुष्मानाचें डुलतें डौलानं
दरारा तुझा मनीं नेणें
सर करुनी गड कोंडाणा
देशील कधीं मज वाळा

मी दिला मुलाचा मान
तानाजी मालुसऱ्याला
यशवंत वीर नरसिंह
ही खास कामगिरि त्याला
कोंडाण्याचें सुतकी वैभव बघवेना नयनीं
मराठा गडी यशाचा धनी ॥ २ ॥
उभारिला अंगणीं सुमंगल मांडव लग्नाचा
नोवरा सुत तानाजीचा
महालक्ष्मी-परी मंदिरीं मिरवत वरमाई
कुठेंही उणेपणा नाहीं
पति पत्नी अति आनंदें
जमवुनी सकल गणगोत
देवकार्य पूजित होती
नोवऱ्यामुलासमवेत
मंडपीं जाहली दाटी
बहु वाजंत्र्याचा थाट
शिवाजिचा जासूद पोहोंचला निरोप घेवोनी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ३ ॥
कामगिरी नेमिली अम्हांला गड कोंडाण्याची
तयारी करा निघायाची
लग्न-मंडपीं सेना-सागर क्षणीं उचंबळला
घातला कर समशेरीला

घरधनीण बोलत होती
एकांतीं तानाजीतें
माझ्या रायबाला
उजवुनी आपुल्या हातें
एवढी विनती माना
रणिं उद्यां जायचें होतें
स्वप्न उद्याचें आज सतीला सांगितलें कोणीं
मराठा गडी यशाचा धनी ॥ ४ ॥
सखे सांजणी शिवरायावर सोपविली सारी
आमुच्या मनची मुखत्यारी
हुकुम धन्याचा अवमानुनि मी इथे कसा राहू
कसा मी बेइमान होऊं
शुभ शकुन शिवाची आशा
साधुनी मनाचा मुहुर्त
रणिं निघे वीर झुजार
स्वसुखावर हाणुन लाथ
शिकविली शिस्त शिवबांनीं
अनुयायी आचरतात
म्हणुनि मृत्युवर मात मिळविली लढुनी रणरंगणीं
मराठा गडी यशाचा धनी ॥ ५ ॥
उदयभानु सरदार आपणा यवन म्हणवि वाचे
परी तें बीज रजपुताचें

सेना-शिस्तिनें करि रात्रंदिन राखण किल्ल्याची
दहशत मनीं मराठ्याची
कोयळीं बनुनि तान्हाजी
स्वातंत्र्य-पोत पाजळिला
जन तेथिल भाविक भोळे
क्षणिं फितूर झाले त्याला
चुकवुनी जागता पहारा
चढविला गडावर हल्ला
समरसंत ते मनात हरहर महादेव गर्जुनी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ६ ॥
समशेरीहुनि असह्य समरिं मार मराठ्याचा
उडविला फडशा शत्रूचा
शत्रुसैन्य रणिं किती निमाले कोण करिल गणती
भयंकर काळोख्या राती
ती नव्हे रात्र काळोखी
पांघरुनि कांबळा काळा
जणु पार्थ-सारथी कृष्ण
सहाय्यार्थ धावुनी आला
यश हानि धर्मवीरांनीं
वाहियली भगवताला
मृत्युंजय जयवंत मराठी बाणा मर्दांनी
मराठा गडी यशाचा धनी ॥ ७ ॥